# बंबई मुंबई बॉम्बे मुमई

मानसायनं, बाया अन् लेकरायनं गच्च भरेलं शेहर. कुतरे, मांजरी, ऊंदरं अन् कबूतरायनं गचागचा भरेलं शेहर. ऊच्ची ऊच्ची इमारती अन् झोपळ्यायलेही तीनं चार मजल्यावर पोहोचवनारं शेहरं म्हन्जे बंबई. भूकीनं अथिसा कोनीच मरत नाह्यी...पन् जगोनारी अन् घळीक लोकलं अन् भरधाव रस्त्यावर चिरळून मारनारी बंबई. पुलाखाली, झोपळीत, चाळीत अन् ऊच्ची ऊच्ची चाळीस चाळीस मजलीत राह्यनारे लोकायचं जगनं म्हनजे अफलातूनचं.

मुंग्याची रांग लागव तशी हरेक ठिकानी... भाजीपाला घ्या...किराना घ्या...जेवाले हटेलात जा...मुतारीत मुता-हागाले जा...टिकट काहाळाले जा...कटिंगच्या दुकानात जा...ॲटोची लाईनं, बेस्टची लाईन हरेक ठिकानी असते फकस्त अन् फकस्त लाईन. म्हनूनसन्या अथिसा सारे लोकं असतेत घाईत. घरात झोप पुरी होत नाह्यी म्हनूनसन्या लोकलमंदी डुलक्या घेनारे चाकरमाने. अन् ह्या चाकरमान्यायले वक्तावर जेवाची शिदोरी पोचोनारे डबावाले.

घामात मिठ...गुदमर-वनारी बंबई... ऊभारनारी...ऊठोनारी दाबनारी...बंबई. बंबई झोपत नाह्यी. रात असो दिस असो. जागनारे रस्ते. जागनारे घर. जागनारे हटेलं. जागनारे बार. जागनारे लोकं. एकदमच अफलातून बंबई.

ना जात. ना पात. ना नातं, ना गोतं माननारी बंबई. पैश्यात खेयनारी. पैसा है तो सिर्फ बंबई में. म्हनूनसन्या हिले देशाची आर्थिक राजधानी अस् म्हतल्या जाते. अवघ्या भारतातले लोकं नशीब आजमावन्यासाठी अथिसा येतात. अन् कायमचे अथुल्लेच होवूनं जातात अथिसा जगतात अन् अथिसाच मरतात. फास्ट जिंदगी. दिस ऊगते कवा अन् मावळते कवा कायीच कयत नाह्यी. भुलभुलैया बंबई कोनाले कवा भुलवूनं टाकनं काह्यी नेम नाह्यी बापा.

दहीहांडी ऊत्सव, गनपती ऊत्सव, नवरात्री ऊत्सव अथिसा साजरे होतात. गनपतीले, साईबाबाले, गजानन बाबाले माननारे अथिसा लोकं बंबाट हायेत. मुंब्राची मुंबादेवी, दादरचा सिध्दीविनायक, बान्दराचं अन् माहिमचा चर्च, दादरची चैत्यभूमी, बानगंगाचं मुंगसाजी महाराज समाधी स्थळ, महालक्षुमीचं देऊळ, हाजी अली शाह बुखारीचा दर्गा अथिसा सदाई लोकायची गर्दी पाहाले भेटले.

गिरगाव चौपाटी, जुहू चौपाटी, माहिमची चौपाटी, बॅन्ड स्टॅन्ड, नरीमन पॉईंट अथिसा बारो-मास लोकायचा गरदा दिसून येते.

हिंदी सिनेमातल्या हिरो हिरोन्यायचे बंबईतच घर हायेत. दगळी चाळ अजूनं आपला पाया घट्ट धरून ऊभी हाय.

गेट वे ऑफ इंडिया, ताज हटेल, शिवाजी महाराज टर्मिनलची रेल्वेची इमारत, बंबई मानगरपालीकेची टुमदार ईमारत अजूनही तशीच नवीनवरीवानी जवान रूबाबदार आजही हायेत.

वऱ्हाडी कथा

वळापाव अथुल्ल फेमस खानं. ईस सालं आंधी दोन रूपयाचा वळापाव आता दा रूपयावर येवूनं पोचला. पन् आजही अथुल्ले लोकं भूक लागली की चालता बोलता दोही हातात धरून मोठ्या आवळीनं वळापाव खातानी दिसूनं येतात. ॲटो, टॅक्सी, ओला, ऊबेर, लोकल, बेस्ट कुठीसाही येन्याजान्यासाठीचं महत्त्वाचं साधन हाय.

रगळा पुरी, भेलपुरी, वळापाव, मिसळ पाव, थालीपीठ, मेंदूवळा, ईडली, पुरीभाजी, समोसापाव, कांदाभजी, गोलभजी, पालकभजी, आलूभजी, पेटिस, पिझ्झा, बर्गर, मंचूरियन, चायनीज खानं, नुडल, केएफसी चिकन मोठ्या आवळीनं लोकं अथिसा खातात.

गिरनी कामगारायचे, गोदीत काम करनारायचे हाल बेहाल करनारी बंबई. बंबई आमची म्हननारे हे इसरूनच गेले की बंबई हे जहॉगरीत भेटलेली जिन्नस नोय. पंधरा ऑगस्ट अन् स्व्वीस जानेवारीले मेरे देश की धरती सोना ऊगले ऊगले हिरे मोती अन् ऐ मेरे वतन के लोगो.. अशी देशभक्तीपर गीतं अन् जन गन मन अधिनायक जय हे भारत भाग्यविधाता. हे भारतीय राष्ट्रगान म्हनतानी आपलीच नव्हेत अवघ्या भारतीय जनतेची छातीन छाती देशप्रेमानं भरूनं फुगते. मंग बंबईवर मोजकेच लोकं हक्क कसे काय सांगतात. बंबई हे साऱ्यायचीच हाय. कोनीही म्हनू शकत नाह्यी फकस्त बंबई हे माहालावीचं हायं. मंग थे ऊत्तर प्रदेशचे असो, बिहार चे असो, आंध्र प्रदेशचे असो, राजस्थानचे असो की गुजरातचे. सैन्यदलात फकस्त एकाच राज्याचे लोकं नाहीत. भारत आपला हाय. मंग भारतीय मानूस कुठीसाही कवाही जावू फिरू शकते ना बापा.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची साक्ष देनारा धगधगती दीपस्तंभी ज्योत आजही मोठ्या दिमाखात भळकतानी व्ही.टी. ठेसनाबाहेर दिसू येते. डांबरी अन् सिमेंटीच्या गुळगुळीत रसत्यावर धावनारे टांगे, टॅक्सी, दोन मजली बसा, लाखो करोळाच्या मोटारगाळ्याची रेलचेलं दिसरात दिसून येते.



सिग्नल सिग्नल् जौळ ऊली ऊली हार, पेन, रंगबेरंगी फुगे ईकनारे बाया, बाप्पे, पोट्टे, पोट्या दिसूनं येतात. ह्याच सिग्नलवर म्हतारे कोतारे एक विशिष्ट जमात भिक मांगतानी दिसूनं येते. अवघ्या महाराष्ट्राचा कारोभार चालोनारं मंत्रालय, विधानसभा भवन, विधान परिशद भवन अथिसा हायं.

बंबईत कोनी एकट दुकट असल त थो अरबीले दोस्त करूनं बाता करते. झोपळपट्यातलीही कायनी लयचं अल्लग हायं. दिवसाढवळ्या रात सामटायनं पळते. गल्यागल्यात भरदिवसा लायटं लावले जाते. एखांदी ढेपशी बाई नाहित मानूस जर ह्या सांमटीत शिरला त आपल्याले आ-पले पावलं रिटनं मांग घ्या लागते. धारा-वी झोपळपट्टी, मानखुर्द झोपळपट्टी, गोवंडी झोपळपट्टी, बांदरा झोपळपट्टी, चेंबूर झोपळपट्टी, माहिम झोपळपट्टी. ह्या झोपळपट्टीत चालतात घरगुती गृह उद्योग जसे राखी बनवने, कपळ्यावरचं जरीचं काम, जनावराच्या चामळ्यापासूनं वस् अशी हे बंबई म्हनजे बापा एक अल्लगच दुनिया हायं.

**– सु. पुं. अढाऊकर**
अकोला.
मो. ९७६९२०२५९७

# नेत्रदान : मृत्यूनंतरही उजळू शकते कोणाचे तरी आयुष्य

## गैरसमज दूर करूया – नेत्रदानाचा संकल्प करूया!



**नेत्रदानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि लोकांना नेत्रदानाची प्रतिज्ञा करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६ दरम्यान संपूर्ण भारतात ४१ वा 'राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा' साजरा केला जात आहे, त्यानिमित्त हा लेख.**

डोळे हेच जीवनाचे प्रकाशद्वार असे म्हटले जाते. सुंदर जग पाहण्याचा आनंद दृष्टीमुळेच मिळतो. मात्र कॉर्नियाच्या आजारामुळे अनेक व्यक्तींना अंधत्वाचा सामना करावा लागतो. अशा व्यक्तींच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणण्यासाठी नेत्रदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. मृत्यूनंतर केलेले नेत्रदान हे दोन व्यक्तींना दृष्टी देऊ शकते. त्यामुळे नेत्रदान म्हणजे केवळ अवयवदान नव्हे, तर दुसऱ्याला नवजीवन देणारे महान सामाजिक कार्य आहे.

**नेत्रदान म्हणजे नेमके काय?**

सामान्यतः डोळ्यांचे प्रत्यारोपण असा उल्लेख केला जात असला, तरी संपूर्ण डोळ्याचे प्रत्यारोपण केले जात नाही. डोळ्याच्या पुढील पारदर्शक भागाला 'कॉर्निया' अर्थात 'नेत्रपटल' म्हणतात. मृत व्यक्तीच्या डोळ्यातील निरोगी कॉर्निया काढून तो गरजू रुग्णाच्या डोळ्यात प्रत्यारोपित केला जातो. कॉर्निया पारदर्शक नसल्यामुळे आलेल्या अंधत्वावर कॉर्निया प्रत्यारोपणाचा उपयोग होऊ शकतो.

**मृत्यूनंतर त्वरित निर्णय आवश्यक**

मृत्यूनंतर शक्यतो चार ते सहा तासांच्या आत जवळच्या नेत्रपेढीशी संपर्क साधणे आवश्यक असते. नेत्रदानासाठी मृत व्यक्तीला कोणत्याही रुग्णालयात नेण्याची गरज नसते. प्रशिक्षित वैद्यकीय पथक घरी किंवा रुग्णालयात येऊन अत्यंत सन्मानपूर्वक प्रक्रिया पूर्ण करते. ही प्रक्रिया साधारणतः २० ते ३० मिनिटांत होते.

नेत्रदानामुळे मृत व्यक्तीच्या चेहऱ्यावर कोणतीही विद्रूपता येत नाही. अंत्यविधीलाही विलंब होत नाही. त्यामुळे नातेवाईकांनी मनातील भीती आणि गैरसमज दूर करून नेत्रदानासाठी पुढाकार घ्यावा.

**कोण करू शकते नेत्रदान?**

वय, स्त्री-पुरुष भेद, चष्म्याचा नंबर, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया, मधुमेह किंवा रक्तदाब यांसारख्या अनेक बाबी नेत्रदानासाठी नेहमीच अडथळा ठरत नाहीत. मृत्यूनंतर नेत्रपेढीचे वैद्यकीय पथक कॉर्नियाची तपासणी करून प्रत्यारोपणासाठी त्याची उपयुक्तता ठरवते. काही संसर्गजन्य किंवा गंभीर आजारां-मध्ये नेत्रदान स्वीकारले जाऊ शकत नाही; याचा अंतिम निर्णय नेत्रपेढीतील तज्ज्ञ घेतात. व्यक्तीने हयातीत नेत्रदानाचा संकल्प केला असला, तरी मृत्यूनंतर कुटुंबियांची संमती आणि तत्परता अत्यंत महत्त्वाची असते. म्हणून आपल्या इच्छेबद्दल कुटुंबियांशी आधीच स्पष्टपणे चर्चा करणे आवश्यक आहे.

**मृत्यूनंतर कुटुंबियांनी काय करावे?**

मृत व्यक्तीचे डोळे अलगद बंद करावेत. डोक्याखाली उशी ठेवून डोके थोडे उंच करावे. शक्य असल्यास पंखा बंद करावा आणि डोळ्यांवर स्वच्छ ओलसर कापड ठेवावे. त्यानंतर विलंब न करता जवळच्या अधिकृत नेत्रपेढीशी संपर्क साधावा. मृत व्यक्तीची वैद्यकीय माहिती आणि मृत्यूची वेळ नेत्रपेढीच्या पथकाला सांगावी.

**नेत्रदानाबाबतचे गैरसमज**

नेत्रदान केल्याने पुढील जन्मात अंधत्व येते, चेहरा विद्रूप होतो किंवा धार्मिक विधींमध्ये अडथळा निर्माण होतो, असे अनेक गैरसमज समाजात आढळतात. या समजुतींना कोणताही वैज्ञानिक आधार नाही. उलट, विविध धर्मांनी दानाला सर्वोच्च स्थान दिले आहे. मृत्यूनंतर आपले डोळे मातीत मिसळण्याऐवजी ते एखाद्या गरजू व्यक्तीला दृष्टी देऊ शकतात. यापेक्षा मोठे पुण्य कोणते?

**संकल्पाबरोबर कृतीही आवश्यक**

देशात कॉर्नियाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांची संख्या मोठी आहे. केवळ नेत्रदानाचा फॉर्म भरून ठेवणे पुरेसे नाही. आपल्या संकल्पाची माहिती कुटुंबातील प्रत्येक सदस्याला असणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर दुःखाच्या प्रसंगीही कुटुंबियांनी सामाजिक भान ठेवून त्वरित नेत्रपेढीशी संपर्क साधला, तर दोन व्यक्तींचे जीवन प्रकाशमान होऊ शकते.

नेत्रदान ही मृत्यूवर मात करणारी मानवतेची सुंदर अभिव्यक्ती आहे. आपण या जगातून निघून गेल्यानंतरही आपल्या डोळ्यांतून दुसरी व्यक्ती हे सुंदर जग पाहू शकते. म्हणूनच प्रत्येकाने आजच नेत्रदानाचा संकल्प करावा आणि आपल्या कुटुंबियांनाही त्यासाठी प्रेरित करावे.

मरावे परी नेत्ररूपी उरावे-नेत्रदान करा, दोन जीवनांत प्रकाश भरा!

**– डॉ. विवेक मोतेवार**
वरिष्ठ नेत्रशल्यचिकित्सक व मोतीबिंदू-लेझरतज्ज्ञ,
संचालक- मोतेवार नेत्रालय अँड हायटेक आय इन्स्टिट्यूट, डॉक्टर्स लेन, नांदेड
मो. ९८५०६४४९९६

# 'एआय'च्या युगात शिक्षकांची भूमिका अधिक महत्त्वाची

आज शिक्षण क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. डिजिटल तंत्रज्ञान, इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे शिकण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला आहे. काही सेकंदांत प्रश्नांची उत्तरे मिळतात, गृहपाठ पूर्ण होतो. या पार्श्वभूमीवर एक मूलभूत प्रश्न गांभीर्याने विचारण्याची गरज आहे. एआय शिक्षकांची जागा घेऊ शकते का? याचे उत्तर ठामपणे 'नाही' असेच आहे.



एआय हे ज्ञान मिळवण्याचे साधन आहे; मात्र ज्ञानाचा योग्य वापर करण्याची विवेकबुद्धी, विचारशक्ती, शिस्त आणि जीवनमूल्ये निर्माण करण्याचे कार्य शिक्षकच करू शकतात. याची जाणीव करून देणारा एक अनुभव महत्त्वाचा आहे. एका विद्यार्थ्याला शिक्षकांनी स्वाध्याय दिला. अभ्यास करण्याऐवजी त्याने Chat-GPT च्या मदतीने स्वाध्याय पूर्ण केला. पालकांनी त्याचे कौतुक केले. मात्र शिक्षकांच्या लक्षात आले की, उत्तर बरोबर असले तरी विद्यार्थ्याला विषयच समजलेला नाही. शिक्षकांनी समजावले-तंत्रज्ञानाचा वापर चुकीचा नाही, पण प्रत्येक उत्तर तयार घेणे म्हणजे विचार प्रक्रिया थांबवणे.

मुख्याध्यापकांनी पालकांना बोलावले असता पालक म्हणाले, आम्ही फी भरतो, आज तंत्रज्ञानाचे युग आहे, मुलाने एआय वापरले तर चूक काय? शिक्षक तंत्रज्ञानाला विरोध करत नव्हते, ते शिकण्याच्या प्रक्रियेचे संरक्षण करत होते. पुढे तोच विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेत अडकला. हातात प्रश्नपत्रिका होती, पण Google सोबत नव्हता. स्वतःच्या शब्दांत उत्तर लिहिता आले नाही. यातून प्रश्न निर्माण होतो – आपण मुलांना उत्तरे मिळवून देत आहोत की उत्तर शोधण्याची क्षमता विकसित करत आहोत?

**पालकांनी काय करावे?**

प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर प्रत्येक अभ्यासासाठी मोबाईलची गरज नाही. गृहपाठ मिळाल्यावर लगेच मोबाईलवर शोधण्याऐवजी – प्रथम पाठ्यपुस्तक वाचावे, ग्रंथालयातील संदर्भ वापरावेत, स्वतःच्या शब्दांत मुद्दे लिहावेत, शिक्षकांना प्रश्न विचारावेत, प्रत्यक्ष कृतीतून समजून घ्यावे.

शिक्षण म्हणजे शोधणे, चूक करणे, दुरुस्त करणे आणि पुन्हा प्रयत्न करणे. ही प्रक्रिया तयार उत्तरांमुळे थांबू नये. आज एआयचा वापर टाळणे शक्य नाही. विद्यार्थ्यांना त्याचा जबाबदार वापर शिकवणे हीच शिक्षकांची नवी जबाबदारी आहे. विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास ओळखणे, शांततेमागील कारण समजून घेणे, अपयशानंतर प्रेरित करणे हे कोणतेही तंत्रज्ञान करू शकत नाही. पालक आणि शिक्षक यांची भूमिका परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहे.

शेवटी – एआय माहिती देऊ शकते; शिक्षक तिचा अर्थ समजावतो. एआय उत्तर देऊ शकते; शिक्षक प्रश्न विचारायला शिकवतो. एआय चुका दाखवू शकते; शिक्षक त्या चुकांतून शिकवतो. एआय काम सोपे करू शकते; शिक्षक व्यक्तिमत्त्व घडवतो. एआय ज्ञान देऊ शकते; पण शिक्षक माणूस घडवतो. तंत्रज्ञान विद्यार्थ्याच्या हातात असावे, पण शिक्षकाचे मार्गदर्शन सोबत असावे. एआय कितीही प्रगत झाले तरी योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकाची गरज संपणार नाही, उलट वाढणार आहे.

**–ज्योत कौर जितेंद्रसिंग पहाडिया**
मुख्याध्यापिका,
युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल, नांदेड

# डीजे हटवावा; मात्र गणेशोत्सवाचा उत्साह नव्हे!





गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन म्हणजे भक्ती, आनंद, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचा सोहळा. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश देण्याची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. मात्र कालांतराने या उत्सवात मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषण, अवाजवी खर्च आणि दिखाव्याची स्पर्धा वाढताना दिसत आहे. विशेषतः डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

गणेशोत्सवातील मिरवणुका, मंडप आणि विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या आवाजात डीजे वाजवण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. आवाजाची तीव्रता इतकी मोठी असते की परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण तसेच रात्रपाळी करून विश्रांती घेणाऱ्या नागरिकांच्या शांततेवर त्याचा परिणाम होतो. केवळ माणसांनाच नव्हे, तर पक्षी आणि प्राण्यांनाही मोठ्या आवाजाचा त्रास होतो. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आनंदात इतरांच्या आरोग्याचा आणि शांततेचा बळी देणे योग्य ठरणार नाही.

पुण्यात सुरू झालेल्या 'डीजे हटाव' चळवळीला मिळणारा प्रतिसाद ही वाढत्या जनजागृतीची चिन्हे आहेत. या चळवळीचे पडसाद महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये आणि गावांमध्ये उमटताना दिसत आहेत. मात्र प्रश्न असा आहे की, डीजेवर पूर्णपणे बंदी घालणे हा उपाय आहे की आवाजाला मर्यादा घालणे हा अधिक योग्य मार्ग आहे? यावर समाजाने आणि प्रशासनाने शांतपणे विचार करणे आवश्यक आहे.

गणेशोत्सवातील पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, भजन, कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांना आपली वेगळी ओळख आहे. आधुनिक मनोरंजनाच्या नावाखाली पारंपरिक संस्कृती बाजूला पडणे योग्य नाही. उत्सवातील आनंद टिकवून ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाला आळा घालणे शक्य आहे. त्यासाठी ध्वनीची मर्यादा, वेळेचे काटेकोर पालन आणि नियमांचे प्रभावी पालन आवश्यक आहे.

यासाठी प्रशासनाने केवळ गणेशोत्सवाच्या काळात कारवाई न करता वर्षभर जनजागृती केली पाहिजे. गणेश मंडळांनीही सामाजिक जबाबदारी स्वीकारून ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सव साजरा करण्याचा संकल्प केला पाहिजे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणताही भेदभाव न करता कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर नागरिकांनीही तक्रार करण्यापेक्षा प्रथम स्वतः जबाबदार नागरिक म्हणून नियमांचे पालन करण्यास सुरुवात केली पाहिजे.

गणेशोत्सव हा आवाजाची ताकद दाखवण्याचा नव्हे, तर भक्तीची ताकद दाखवण्याचा उत्सव आहे. डीजेचा दणदणाट जितका मोठा, तितकी भक्ती मोठी असे समीकरण असू शकत नाही. उलट शांतता, शिस्त, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यामुळे उत्सवाचे खरे सौंदर्य खुलते.

डीजेचा दणदणाट थांबवणे म्हणजे गणेशोत्सवाचा उत्साह कमी करणे नव्हे. उलट ध्वनिप्रदूषणाला आळा घालून भक्ती, संस्कृती आणि सामाजिक सलोखा जपणे होय. 'उत्सव हवा, पण त्रास नको' हा विचार प्रत्येक गणेश मंडळाने आणि प्रत्येक नागरिकाने स्वीकारला, तर गणेशोत्सव खऱ्या अर्थाने आनंदोत्सव ठरेल.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

## स्मरण क्रांतिवीरांचे !

जे लढले होते तेव्हा
आज ते अस्तित्वात नाहीत,
आहेत जे आज ईथे त्यांना
स्वातंत्र्याचे मोलच नाही
दुःखाची झळ सोसली त्यांनी
भविष्याची पर्वा केली नाही,
सुख आज आम्ही उपभोगतोय
आम्हाला त्यांची कदर नाही...
स्वप्न त्यांच्या डोळ्यातले
पारतंत्र्यात कधी साकारले नाही,
त्यांच्या स्वप्नांचे मूल्य
आम्हाला आज कळणार नाही
रक्त सांडले, फास स्वीकारला
जखमांना कधी कुरवाळले नाही,
ध्यास एकची स्वातंत्र्याचा
मोहाचा स्पर्श होऊ दिलाच नाही...
हसत हसत लढत राहिले
वंदे मातरम् बोलण्यास विसरले नाही,
मृत्यु समोर उभा असतानाही
माघार त्यांना मान्यच नाही
देशाला केले मुक्त जोखडातून
छळाला त्यांनी जुमानले नाही,
लढले ते वीर क्रांतिकारक
स्वातंत्र्याची फळे त्यांनी चाखलीच नाही...
स्वातंत्र्य दिनाच्या या पवित्र क्षणी
त्यांना न स्मरून चालणारच नाही
ते लढले म्हणून आज आहोत आपण
त्यागाविना त्यांच्या आपले अस्तित्वच नाही

**–ज्योती रावराणे,**
कांजूरमार्ग, मुंबई

# ‘नेत्रदान’ महादानचा संदेश देत नांदेड शहरातून जनजागृती रॅली

## राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यानिमित्त लायन्स नेत्र रुग्णालयाचा उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** ‘राष्ट्रीय नेत्रदान जनजागृतीतून अंधत्वावर मात’ या संकल्पनेतून राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यानिमित्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व नंदीग्राम लॉयन्स ट्रस्ट नांदेड संचलित नेत्र रुग्णालय नांदेड यांच्या वतीने शहरातून नेत्रदान जनजागृती रॅली काढण्यात आली. ‘नेत्रदान–महादान’, ‘मृत्यूनंतरही डोळ्यांतून दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करा’, अशा प्रभावी घोषवाक्यांनी नांदेड शहर दुमदुमून गेले. रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



जंगमवाडी येथील लायन्स नेत्र रुग्णालयापासून रॅलीचा शुभारंभ लायन्स प्रांत ३२३४ एच २ चे प्रथम उपप्रांतपाल लॉयन योगेशकुमार जायस्वाल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी नागरिकांनी नेत्रदानासारख्या मानवतावादी उपक्रमात सहभागी होऊन ‘नेत्रदान–महादान’ या संदेशाला बळ द्यावे, असे आवाहन केले. नंदीग्राम नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष लॉयन राजेश लोटिया, सचिव लॉयन ॲड. प्रवीण अग्रवाल, कोषाध्यक्ष लॉयन अरुणकुमार तोष्णीवाल, उपाध्यक्ष लॉयन गंगाप्रसाद तोष्णीवाल, सहसचिव लॉयन शिरीष कासलीवाल यांच्यासह सर्व लॉयन्स क्लबचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, लॉयन्स नेत्र रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

जंगमवाडी येथून सुरू झालेली ही रॅली आयटीआय, शिवाजीनगर, कलामंदिर, हनुमान पेठ, महावीर चौक मार्गे जुना मोंढा टॉवर येथे पोहोचली. संपूर्ण रॅली दरम्यान सहभागींच्या हातातील नेत्रदान जनजागृतीचे फलक आणि घोषवाक्यांमुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले. नेत्रदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा संदेश रॅलीतून देण्यात आला.

रॅलीदरम्यान महात्मा फुले पुतळा चौक आणि जुना मोंढा, नांदेड येथे लॉयन्स नेत्र रुग्णालय, जंगमवाडी तसेच सिडको येथील डॉक्टर व कर्मचारी यांच्या वतीने नेत्रदान जनजागृतीवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. मृत्यूनंतर नेत्रदान केल्याने दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो, हा अत्यंत संवेदनशील आणि समर्पक संदेश पथनाट्यातून देण्यात आला. उपस्थित नागरिकांनी पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा साजरा केला जातो. नेत्रदानाचे महत्त्व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, नेत्रदाना संदर्भातील गैरसमज व भीती दूर करणे आणि अधिकाधिक नागरिकांना नेत्रदानासाठी प्रेरित करणे, हा या जनजागृती अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

‘मृत्यूनंतर आपले डोळे मातीत जाण्याऐवजी एखाद्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करू शकतात. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडावी,’ असा संदेश रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

रॅलीचा समारोप जुना मोंढा टॉवर येथे वजिराबाद वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष तिडके यांच्या उपस्थितीत करण्यात आला. रॅली सुरळीत पार पाडण्यासाठी वाहतूक शाखेच्या पोलिसांनी सहकार्य केले. सामाजिक बांधिलकी जपत नेत्रदान जनजागृतीचा संदेश शहरातील विविध भागांत पोहोचविण्यात रॅली यशस्वी ठरली. समारोपप्रसंगी लॉयन राजेश लोटिया यांनी उपस्थितांचे आभार मानले. नेत्रदान जनजागृती रॅली यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी जंगमवाडी व सिडको येथील डॉक्टर्स स्टॉफ यांनी परिश्रम घेऊन रॅली यशस्वी केली.

# शालेयस्तरावर गावोगावी विद्यार्थिनीसाठी बाल सुरक्षिता उपक्रम; जाणीवजागृती मोहीम

## प्रणिताताई देवरे–चिखलीकर यांचा सामाजिक उपक्रम

**लोहा (प्रतिनिधी)–**शालेयस्तरावर विद्यार्थिनींना बॅड टच –गुड टच याची जाणीव व्हावी, मुलीत जागरूकता निर्माण झाली तर ती सुरक्षित राहील या हेतूने जिल्ह्यात प्रणिताताई यांनी ‘ताईंसाठी ताई’ ही बालसुरक्षता मोहीम हाती घेतली आहे, प्रायोगिक तत्वावर लोहा तालुक्यात माजी नगरसेविका शोभाताई बगडे–नळगे व कंधार तालुक्यात ॲड औरादकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम गावोगावच्या शाळांतून राबविण्यात येत आहे. प्रणिताताई यांच्या सामाजिक उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील शालेय मुलींमध्ये जाणीवजागृती निमार्ण होण्यास मदत होत असून, दररोज दोन शाळेत जाऊन प्रॉजेक्टरद्वारे शालेय मुलीचे प्रबोधन केले जात आहे. शुक्रवारी जुन्या लोहा येथील शिवछत्रपती विद्यालयात हा कार्यक्रम पार पडला.



नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका, भाजपा महिला मोर्चा प्रदेश महामंत्री सौ. प्रणिताताई देवरे चिखलीकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ’जागरूक मुलगी–सुरक्षित मुलगी’ हा स्तुत्य, गरजू, अभिनव, उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला. प्रयोगिक तत्त्वावर ही मोहीम लोहा–कंधार तालुक्यातील शाळांमधून राबविण्यात येत आहे.

जुन्या शहरातील शिवछत्रपती विद्यालयात शुक्रवारी (४ सप्टेंबर) संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीकांत पाटील पवार यांच्या उपस्थितीत जागरूक मुलगी–सुरक्षित मुलगी हा कार्यक्रम घेण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक दामोदर वडजे, मुख्याध्यापक (प्रा.) हणमंत पवार, या उपक्रमाच्या प्रमुख माजी नगरसेविका शोभाताई बगडे –नळगे, डोंगरे, पोशट्टी, शिक्षक डी. एम. कहाळेकर, हरिहर धुतमल, आर. आर. पिठ्ठलवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख मार्गदर्शिका शोभाताई बगडे यांनी बॅड टच–गुड टच विषयी मुलींना मार्गदर्शन केले. कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नका, सजग राहा, बॅड टच बाबत जागरूक राहावे, वेळीच आई–वडील व गुरुजनांना सांगावे, असे आवाहन केले. मुख्याध्यापक दामोदर वडजे यांनी या उपक्रमाची माहिती देताना आजूबाजूच्या घटना कशा घडताहेत यावर भाष्य केले व प्रणिताताई यांनी सुरू केलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी हरीहर धुतमल यांनी मार्गदर्शन केले. शाळेत श्रीकांत पाटील, शोभाताई बगडे, मुख्याध्यापक वडजे, मुख्याध्यापक पवार व मान्यवरांच्या हस्ते प्रणिताताई यांच्या वाढदिवसानिमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले. संचलन एस. एच. शेख यांनी तर आभार रमेश पिठ्ठलवाड यांनी मानले.

# क्रॉस कंट्री धावणे स्पर्धेत दीपक भुसारेचे यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत क झोन अंतर महाविद्यालय क्रॉस कंट्री दहा किलोमीटर धावणे या स्पर्धेत प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचा खेळाडू दीपक भुसारे याने द्वितीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेत क झोन अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयाने सहभाग घेतला होता. या सोबतच सदर स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा खेळाडू निखील गुलाब दुधमल याने उत्कृष्ट प्रदर्शन केल्याबद्दल त्याचा देखील महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर यांनी सत्कार केला व पुढील स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



# आफ्रोह संघटनेचे उद्या महाराष्ट्रभर निदर्शने आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** अन्यायग्रस्त आदिवासी मन्नेरवारलू, कोळी महादेव, कोळी मल्हार, टोकरे कोळी, ढोर कोळी, माना, हलबा, हलबी व इतर ३३ अनुसूचित जमातींना जात प्रमाणपत्र व जात वैधता न मिळणे, मिळालेली जातवैधता लबाडीने व फसवणूक करून अवैध करणे, घटनात्मक हक्कापासून वंचित ठेवणे आदिवासी विभागाच्या या इतर अनेक बाबतीत केल्या जाणाऱ्या अन्यायाविरुद्ध न्याय मिळवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रासह नांदेड येथे सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ५ या वेळात जिल्हाधिकारी कार्यालय येथे हे निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे.

दि. २२ जुलै २०२६ मधील जात प्रमाणपत्र (सुधारणा) कायदा –२०२६, ६१ क्रमांकाचा कायदा/ विधेयक रद्द करणे किंवा योग्य तो बदल करणे, जातवैधता प्रमाणपत्राची सु–मोटो पुनर्तपासणी न करणे, विलंबाने जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या अ.ज. कर्मचाऱ्यांस पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीचे लाभ देणे, रक्त नात्यात कुटुंबातील सदस्यांची वैधता झाली असेल तर इतरांना ती तत्काळ, विनाचौकशी, सहजपणे मिळण्याचा २४ नोव्हेंबर २०१७ चा शासन निर्णय एसटी प्रवर्गास लागू करावा, अधिसंख्य पदावर वर्ग न होण्यापूर्वीच मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर करणे, शासकीय व निमशासकीय विभागातील जात प्रमाणपत्र अवैध ठरवलेल्या व सेवा समाप्त कर्मचाऱ्यांस अधिसंख्य पदावर नेमणूक देणे आणि त्यांना निवृत्तीवेतन मंजूर करणे आदी प्रमुख मागण्यांसाठी निदर्शने करण्यात येणार आहेत.

सर्व अन्यायग्रस्त जमात बांधवांनी या निदर्शने आंदोलनात सामील होऊन आपला आवाज शासनापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आफ्रोह संघटनेचे राज्याध्यक्ष राजेश सोनपरोटे, महासचिव दीपक केदार, राज्य पदाधिकारी दत्तात्रय अन्नमवाड, मनीष पंचगाम, देवराव नंदनवार, ॲड. सुधीर राऊतवाड, माधवराव अडबलवाड, जिल्हा पदाधिकारी साईनाथ रामोड, गंगाधर आंदेलवाड, नागेश लोलापोड, माधव लोलापोड, सुदर्शन रामोड, गंगाधर टिपरसे, देवराव टिपरसे, नारायण लंकलवाड, किशन अडबलवार, पोशेट्टी कासलोड, दिगंबर तोंडेवाड, विठ्ठल तुम्मोड, पांडुरंग पाकलवाड, बाबुराव ईरलेवाड, शंकर कोलावाड, सायलू मंकोड, संतोष आवटे, विठ्ठल भोसले, आनंद यडपलवार, शिवाजी अडबलवाड, नरेश रापतवार, गंगाधर पोगुलवाड, मुत्तेपोड, गोविंदवार, सिंगनवाड, बुच्छलवार यांनी केले आहे.

# ‘एक दिवस शिक्षकांच्या भूमिकेत’- गोविंदेश्वर शाळेत विद्यार्थ्यांनी सांभाळले शाळेचे कामकाज



**नांदेड (प्रतिनिधी)–** गोविंदेश्वर प्राथमिक शाळा, तरोडा बु. येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांच्या कार्याची व जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनी कु. सानवी गायकवाड हिने मुख्याध्यापिकेची, तर विद्यार्थी अक्षय गवाले, रुद्रा सरकुंडे, श्रेया पांचाळ, अक्षरा तरटे, स्वरा गायकवाड, श्रृष्टी लहाडे व स्नेहल जाधव यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत शाळेचे दैनंदिन कामकाज पाहिले.

विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या समजून घेत शाळेचे कामकाज उत्सांहाने पार पाडले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व, शिक्षकांची भूमिका आणि विद्यार्थ्यांच्या जीवनातील शिक्षकांचे स्थान याबाबत मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला असून, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव व आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

# सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुनंदा राऊत यांना सापडलेली २० ग्रॅम सोन्याची चैन केली परत




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ.सुनंदा राऊत यांना २० ग्रॅम सौन्याची चैन सापडल्यानंतर चौकशी करून त्यांनी श्रीकृष्ण मंदिर येथे बोलावून संबंधित महिला सौ. रेखा पाटील यांना परत केली. यावेळी परिवाराने आभार मानले असून, सौ. राऊत यांच्या प्रामाणिकतेबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

नवीन नांदेड परिसरातील मित्र नगरमधील रहिवाशी नागनाथराव पाटील यांची २० ग्रॅम सोन्याची साखळी दि. ३० ऑगस्ट रोजी रात्री १० चे सुमारास रस्त्यावर हरवली. रात्री बराच वेळ त्यांनी शोधाशोध केली, पण सापडली नाही. दुसरे दिवशी सकाळी लवकर उठून शोधली तरीही सापडली नाही. दि. १ सप्टेंबर २६ रोजी फिरायला जात असताना कॉलनीत राहणाऱ्या भारत विद्यालय प्राथमिक विभागाच्या सेवा निवृत्त मुख्याधापिका सौ. सुनंदा गणपत राऊत यांना ती चैन सापडली. सौ. राऊत यांनी सौ. रेखा पाटील यांना श्रीकृष्ण मंदिरात बोलावून परत केली.

# गणेश बडूरे व संतोष पचलिंग यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

नांदेड (प्रतिनिधी)– महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेच्या वतीने शिक्षकदिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळा नांदेड येथे आयोजित केला आहे. जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक गणेश प्रभूअप्पा बडूरे व सहशिक्षक संतोष पद्माकर पचलिंग यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांना हा पुरस्कार दि. २० सप्टेंबर रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेचे टप्पा १ घरकुलांचे बांधकाम मुदतीत पूर्ण करा –मुख्याधिकारी जगदीश दळवी

## अन्यथा अनुदानास मुकावे लागेल नगरपंचायत अर्धापूर यांचे नागरिकांना आवाहन

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १ अंतर्गत लाभार्थ्यांनी घरकुलांच्या बांधकामाला सुरुवात केली आहे. काही लाभार्थ्यांची घरे अपूर्ण राहिली आहेत. त्या लाभार्थ्यांनी अपूर्ण घरकुलाचे बांधकाम वेळीच करून शासनाच्या अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरपंचायतीचे मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी केले आहे.



ज्या लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे काम सुरू केले आहे. परंतु काही तांत्रिक किंवा इतर कारणांमुळे ते पूर्ण होऊ शकले नाही अशा नागरिकांच्या भेटी व सूचनांच्या माध्यमातून कळविण्यात येते की, सद्यस्थितीत ही योजना अंतिम टप्प्यात असून, शासनाकडून घरकुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. मुदतीत बांधकाम पूर्ण करून अनुदानाच्या मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव सादर न केल्यास शासन नियमानुसार पुढील अनुदानास मुकावे लागेल याची नोंद घ्यावी. शासकीय नियमांनुसार ठरवून दिलेल्या वेळेत बांधकाम पूर्ण न झाल्यास अनुदानाच्या वितरणात अडथळे निर्माण होऊ शकतात किंवा नियमावलीनुसार सविस्तर प्रकल्प अहवालातून नाव कपात होणे व प्रशासकीय निर्देशा–नुसार पूर्वी मिळालेली रक्कम परत करण्याबाबतची कायदेशीर प्रक्रिया लागू होऊ शकते. नागरिकांवर अशी अडचण येऊ नये व सर्वसामान्यांचे हक्काचे घर लवकरात लवकर पूर्ण व्हावे हाच या आवाहनाचा मुख्य उद्देश असल्याचे कळविण्यात आले.

# डॉ. ज्ञानेश्वर पवार यांना ‘डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार’ जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा ‘डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार’ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील मान्यवरांना जाहीर झाला आहे.



सन २०२४–२५ या वर्षाकरिता शिक्षक संवर्गातून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

तसेच सन २०२५–२६ या वर्षाकरिता प्राचार्य संवर्गातून राजर्षी शाहू महाराज महाविद्यालय, लातूरचे प्राचार्य तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. महादेव हरिदास गव्हाणे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. शिक्षक संवर्गातून स्वारातीम विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व सहकार्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश जयंतीलाल वाढेर आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या डॉ. अंजली बालमुकुंद जोशी यांना हा पुरस्कार विभागून जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व पुरस्कारप्राप्तांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# ‘स्वच्छ डबे, निरोगी प्रवास’ नांदेड रेल्वे विभागाची स्वच्छतेसाठी व्यापक यांत्रिक मोहीम!

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड विभाग, दक्षिण मध्य रेल्वे, प्रवासी डब्यांमध्ये स्वच्छता व आरोग्यदायी वातावरणाचा उच्च दर्जा कायम राखण्यासाठी यांत्रिकी स्वच्छता तसेच सातत्यपूर्ण देखरेखीच्या माध्यमातून स्वच्छता व स्वच्छताविषयक सुविधा अधिक चांगल्या करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.






प्रत्येक पिटलाईन अटेन्शनदरम्यान सर्व डब्यांची विशेष यंत्रसामग्री व उपकरणांच्या सहाय्याने सर्वसमावेशक यांत्रिकी स्वच्छता नियमितपणे केली जाते. यामध्ये शौचालयांची उच्च दाबाच्या पाण्याच्या जेटद्वारे स्वच्छता, स्टेनलेस स्टीलच्या वॉशबेसिन व शौचालयातील कमोडची बफिंगद्वारे स्वच्छता, व्हेस्टिब्यूल व गँगवे परिसरातील चेकर्ड प्लेट्सची स्क्रबरच्या सहाय्याने स्वच्छता, दरवाजे व प्रवासी आसन परिसराची स्वच्छता तसेच पिटलाईन अटेन्शनदरम्यान डब्यांच्या बाह्य भागाची यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता करण्यात येते.

याशिवाय, गाडी टर्मिनल स्थानकावर टर्न–अराउंडदरम्यान दाखल झाल्यानंतर शौचालयांची जेट प्रेशरद्वारे स्वच्छता केली जाते. त्यामुळे उपलब्ध प्रत्येक टर्मिनल संधीदरम्यान शौचालयांची नियमित स्वच्छता व देखभाल सुनिश्चित केली जाते.

पिटलाईन व टर्मिनलवरील नियमित यांत्रिकी स्वच्छतेबरोबरच, महत्त्वाच्या गाड्यांमध्ये ऑन बोर्ड हाऊसकीपिंग (जइक्ड) सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. हाऊसकीपिंग कर्मचारी प्रवासादरम्यान स्वच्छतेशी संबंधित प्रवाशांच्या तक्रारी व समस्यांकडे लक्ष देण्यासाठी गाडीत उपलब्ध असतात. तसेच, ते नियमित अंतराने डब्यांची स्वच्छता करतात. त्यामुळे केवळ निर्धारित पिटलाईन अटेन्शनदरम्यानच नव्हे, तर संपूर्ण प्रवासादरम्यान डब्यांमध्ये स्वच्छता राखण्यास मदत होते.

या नियमित व सर्वसमावेशक यांत्रिकी स्वच्छता पद्धतींमुळे प्रवासी डब्यांच्या विविध भागांकडे पद्धतशीरपणे लक्ष दिले जाते आणि प्रवाशांना अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व सुखकर प्रवासाचे वातावरण उपलब्ध करून देण्यास मदत होते.

स्वच्छता ही रेल्वे प्रशासन आणि प्रवासी/वापरकर्ते यांची सामूहिक जबाबदारी आहे. प्रवासादरम्यान स्वच्छता व आरोग्यदायी वातावरण राखण्यासाठी शौचालयांचा योग्य वापर करणे, विशेषतः प्रत्येक वापरानंतर योग्य पद्धतीने फ्लश करणे, अत्यंत महत्त्वाचे आहे. शौचालयातील फ्लशचा अयोग्य वापर किंवा गैरवापर केल्यास दुर्गंधी निर्माण होऊन अस्वच्छ परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे सहप्रवाशांना गैरसोय होण्याबरोबरच प्रवासादरम्यान स्वच्छता राखण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे प्रवाशांनी शौचालयांचा जबाबदारीने वापर करावा आणि प्रत्येक वापरानंतर योग्य पद्धतीने फ्लश करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्रवाशांचे सहकार्य रेल्वे प्रशासनाच्या नियमित स्वच्छता प्रयत्नांना पूरक ठरते आणि संपूर्ण प्रवासादरम्यान स्वच्छ व आनंददायी वातावरण राखण्यास मदत करते.

नांदेड विभाग नियमित यांत्रिकी स्वच्छता, पद्धतशीर देखभाल आणि प्रवाशांच्या सहकार्याच्या माध्यमातून प्रवासी डब्यांमध्ये स्वच्छतेचा उच्च दर्जा कायम राखण्यासाठी कटिबद्ध आहे.

# हळदव येथील शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील मौजे हळदव येथील जि. प. प्रा. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड बिनविरोध झाली असून, अध्यक्षपदी माधव पुंडलिक पवार यांची निवड झाली आहे.

गाव पातळीवर अत्यंत महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या गावातील शाळेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी प्रत्येक जि. प. शाळेवर शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात येते.

लोहा शहराच्या नजिक असलेल्या मौ. हळदव येथील जि. प. प्रा. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडी–संदर्भात बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांची बैठक संपन्न झाली. यावेळी सरपंच सौ. सुजाता गवारे, उपसरपंच प्रल्हाद पाटील वडजे, दिगंबर पाटील शिंदे, पेमराव वडजे माली पाटील, केशव पाटील वडजे, हरी पाटील शिंदे, संदीप पाटील शिंदे, सोपान पाटील शिंदे, बालाजी पाटील पवार, जि. प. प्रा. शाळा हळदवचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक व गावकरी मंडळी उपस्थित होती.

यावेळी सर्वानुमते हळदव येथील शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली ती पुढीलप्रमाणे– अध्यक्ष माधव पुंडलिक पवार, उपाध्यक्ष सौ. मनिषा नरेश वडजे, सदस्य–जर्नादन देविदास वडजे, सदस्या सौ. सविता रमाकांत पवार, सदस्या सौ. आयेशा सद्दाम कुरेशी, सदस्य सचिन त्र्यंबक वडजे, बालाजी एकनाथ पवार, सौ. पूजा अनिल बनसोडे, सौ. शिवकांता माधव वडजे, सौ. बोंतलवाड लक्ष्मी मारोती यांची निवड करण्यात आली. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. देवांशी दत्ता वडजे, रामेश्वर एकनाथ गवळी, माधव किशन वडजे यांची तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्रीमती गजभारे पी. एस., ग्रामपंचायत सदस्य म्हणून शितल सोपान शिंदे, शिक्षणप्रेमी नागरिक म्हणून दत्ता सखाराम शिंदे, सचिव म्हणून शेख डी. बी. यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष माधव पुंडलिक पवार यांच्यासह सर्व नूतन कार्यकारिणीचे पुष्पहाराने उपसरपंच प्रल्हाद पाटील वडजे यांनी हळदव गावकऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच शालेय व्यवस्थापन समिती हळदवच्या अध्यक्षपदी माधव पुंडलिक पवार व उपाध्यक्षपदी सौ. मनिषा नरेश वडजे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन युवानेते बंडू पाटील वडजे, भालचंद्र किशनराव पाटील कदम, लोहा पंचायत समितीचे समग्र शिक्षा अभियानचे जिल्हाध्यक्ष संजय अकोले यांनी केले.

# चंदेरी

# जे माझ्या हिताचे नव्हते, ते वाहून जाऊ दिले...

## अभिनेत्री श्रुती हासनची विशेष मुलाखत

**दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीपासून बॉलिवूडपर्यंत आपल्या अभिनयाची छाप उमटवणारी अभिनेत्री श्रुती हासन विविध भाषांमधील चित्रपटांमध्ये काम करण्यासाठी ओळखली जाते. बालकलाकार म्हणून अवघ्या आठव्या वर्षी अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या श्रुती यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत अनेक चढ-उतार अनुभवले आहेत. अभिनयासोबतच सामाजिक आणि इतर महत्त्वाच्या विषयांवरही त्या स्पष्टपणे आपले मत मांडतात. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत श्रुती यांनी विविधता, भाषा, दक्षिण आणि बॉलिवूडमधील अंतर, ओटीटीमुळे बदललेले प्रेक्षक आणि आपल्या कारकिर्दीतील संघर्ष यावर मनमोकळेपणाने भाष्य केले.**



### अनुभव नाही, त्यावर बोलत नाही...

श्रुती म्हणाल्या, की मला नेहमीच माझ्या स्वतःच्या अनुभवाशी संबंधित किंवा मी जवळून पाहिलेल्या विषयांवर माझे मत मांडायला आवडते. ज्या राजकीय किंवा सामाजिक विषयांची मला पुरेशी माहिती नाही, अशा कोणत्याही अनोळखी विषयांवर मी आजपर्यंत बोललेले नाही. माझ्या अनुभवांच्या आधारे बोलणे मला अधिक योग्य वाटते. अभिनेते कमल हासन यांच्या अभिनयाचा वारसा पुढे नेणाऱ्या श्रुती यांनी प्रभास, रजनीकांत, पवन कल्याण आणि विजय यांसारख्या आघाडीच्या कलाकारांसोबत काम केले आहे. आज दक्षिणेतील अनेक कलाकारांना ‘पॅन इंडिया स्टार’ म्हणून ओळखले जाते. बॉलिवूड आणि दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील अंतर कमी करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. मात्र, हे अंतर अद्याप कायम आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर श्रुती म्हणाल्या, “आपल्या देशात असंख्य वेगवेगळ्या संस्कृती आणि भाषा आहेत. भारताची खरी ओळखच या विविधतेत आहे.

### संकुचित विचारसरणी असेल तर...

श्रुती यांनी भारताच्या विविधतेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरही भाष्य केले. त्या म्हणाल्या, आपल्या देशाबद्दल ‘विविधतेत एकता’ असे म्हटले जाते. ही विविधता कधीच कमी होणार नाही. तुम्ही विकासावर विश्वास ठेवत असाल, तर मग क्षेत्र कोणतेही असो, चित्रपट, वैद्यकीय क्षेत्र किंवा शिक्षण तुम्ही विविधतेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहाल. पण तुमची विचारसरणी संकुचित असेल, तर हीच विविधता तुम्हाला नकारात्मक वाटू शकते. हे प्रत्येक व्यक्तीच्या विचारसरणीवर अवलंबून असते. मी मात्र विविधतेकडे सकारात्मक पद्धतीने पाहते. त्यातून आपल्याला नव्या कथा, नवे दृष्टिकोन मिळतात. प्रत्येक प्रदेशाची स्वतःची वेगळी ओळख आणि वैशिष्ट्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

### ओटीटीमुळे संपूर्ण भारतच आपले घर झाले!

ओटीटीच्या वाढत्या प्रभावामुळे भाषेच्या आणि संस्कृतीच्या सीमा मोठ्या प्रमाणात बदलल्या असल्याचे श्रुती यांनी सांगितले. आज ओटीटीवर लोक प्रत्येक प्रकारचा आशय पाहू शकतात. त्यामुळे संपूर्ण भारतच आपले घर झाल्यासारखे आहे. लोकांमध्ये वेगवेगळ्या भाषा आणि संस्कृती स्वीकारण्याची भावना वाढली आहे. पूर्वी दुसऱ्या भाषेतील चित्रपट डब करून प्रदर्शित केले जात होते. आता प्रेक्षक मूळ भाषेतील चित्रपट पाहतात आणि त्यासाठी उपशीर्षके वाचतात. ही खूप चांगली गोष्ट आहे. त्यामुळे विविध भागांतील कलाकार आणि निर्मात्यांवरही आपल्या कथा अधिक प्रामाणिकपणे मांडण्याची जबाबदारी आली आहे, असे त्या म्हणाल्या. आता प्रत्येकाला आपापल्या कथा प्रामाणिकपणे सांगाव्या लागतील. आणि हेही एक चांगले परिवर्तन आहे, असे श्रुती यांनी सांगितले.

### टीकेने मला खूप काही शिकवले...

आज दक्षिणेतील आघाडीच्या आणि सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक



असलेल्या श्रुती यांच्या कारकिर्दीतही कठीण काळ आला होता. ‘लक’ या चित्रपटातून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. मात्र, हा चित्रपट प्रेक्षकांनी नाकारला आणि त्यांच्या अभिनयावरही मोठ्या प्रमाणात टीका झाली. श्रुती म्हणाल्या, मी ‘लक’मधून कारकिर्दीला सुरुवात केली तेव्हा माझे काम प्रेक्षकांनी नाकारले. माझ्यावर खूप टीका झाली. माझ्यासाठी तो सर्वात मोठा नकार होता. मात्र, त्या टीकेने खचून न जाता त्यातून शिकण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. श्रुती म्हणाल्या, की “मी त्या टीकेकडे सकारात्मक आणि विधायक दृष्टिकोनातून पाहिले. मी टीकेला चाळणीसारखे मानले. त्यातून जे माझ्या हिताचे होते ते स्वीकारले आणि जे माझ्यासाठी योग्य नव्हते, ते वाहून जाऊ दिले. मी माझ्या चुका आणि कमतरतांमधून सातत्याने शिकत राहिले. स्वतःला कोणत्याही एका चौकटीत किंवा ठरावीक सूत्रात अडकवून ठेवायचे नाही, असा मी प्रयत्न केला. श्रुती यांच्या मते, अपयश आणि टीका ही कारकिर्दीचा शेवट नसून स्वतःमध्ये सुधारणा करण्याची संधी असते. विविध अनुभव स्वीकारत स्वतःची वाट निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आणि याच प्रक्रियेत त्यांच्या अभिनय कारकिर्दीलाही नवे वळण मिळाले.

# आमच्या कथा ‘उन्नीस-बीस’ चालणार नाहीत; ‘इक्कीस’च असाव्या लागतात!

## तापसी पन्नूंचा बॉलीवूडला आरसा; पुरुषांच्या चित्रपटांना मोकळीक, महिलांना मात्र प्रत्येक वेळी स्वत:ला सिद्ध करण्याची सक्ती; ‘गांधारी’च्या निमित्ताने तापसी पन्नूंचा स्पष्टवक्तेपणा



**दमदार अभिनय आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाणारी अभिनेत्री तापसी पन्नू आता ‘गांधारी’ या आगामी चित्रपटात एका अंध आईची सशक्त भूमिका साकारताना दिसणार आहे. आपल्या मुलीचा शोध घेण्यासाठी कोणत्याही थराला जाणाऱ्या आईची भावनिक आणि संघर्षमय कथा या चित्रपटातून मांडण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ‘बेबी’ आणि ‘नाम शबाना’ यांसारख्या चित्रपटांमधील साहसी भूमिकांसाठी कौतुक मिळवलेल्या तापसी ‘गांधारी’मधून बऱ्याच काळानंतर पुन्हा एकदा कृतीप्रधान दृश्ये साकारताना दिसणार आहेत. या निमित्ताने त्यांनी आपल्या भूमिकेपासून ते महिला-केंद्रित चित्रपटांच्या संघर्षापर्यंत अनेक विषयांवर मनमोकळेपणाने संवाद साधला.**

### ‘एजंट-कॉप’च्या अनेक भूमिका नाकारल्या

तापसी म्हणाल्या, की ‘बेबी’ आणि ‘नाम शबाना’ला ज्या प्रकारे प्रेक्षकांचे प्रेम मिळाले, त्यानंतर त्याच धाटणीच्या भूमिका करणे माझ्यासाठी नक्कीच आकर्षक होते. त्या काळात फारशा अभिनेत्री कृतीप्रधान भूमिका करत नव्हत्या. मला गुप्तहेर, पोलिस अधिकारी आणि मोहिमांवर आधारित अनेक कृतीप्रधान भूमिका मिळाल्या. मात्र, मला त्या स्वीकारायच्या नव्हत्या. कारण मी खूप थकले होते. त्या चित्रपटांमधील बहुतांश कृतीदृश्ये मी स्वतः केली होती. त्यामध्ये संगणकीय परिणामांचा फारसा वापर नव्हता. त्यामुळे शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूप मेहनत घ्यावी लागत होती. त्यात मी मुळात हिंसक स्वभावाची व्यक्ती नाही. मारामारीची दृश्ये पाहतानाही मला भीती वाटते. त्यामुळे मला या प्रकारच्या भूमिकांपासून थोडा विराम हवा होता. त्याच काळात वेगवेगळ्या भावना आणि अनुभव मांडणाऱ्या चांगल्या भूमिका मला मिळत होत्या. त्यामुळे मी ठरवले होते की, पुन्हा कृतीप्रधान भूमिका करायची असेल तर ती आधीच्या भूमिकांपेक्षा काहीतरी वेगळी आणि अधिक प्रभावी असायला हवी.

» ‘गांधारी’मधील कृती वेगळी का? : ‘गांधारी’ची कथा लेखिका-निर्माती कनिका ढिल्लो यांनी सांगितल्यानंतर मात्र आपला निर्णय बदलल्याचे तापसी यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, कनिका यांनी ‘गांधारी’ची कथा सांगितली तेव्हा मला जाणवले की हा कृतीप्रधान चित्रपट वेगळा आहे. यात एखादे ठरावीक मिशन पूर्ण करण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची गोष्ट नाही. यात मला फक्त माझी मुलगी हवी आहे आणि तिच्यासाठी जे काही करावे लागेल ते मी करणार आहे. त्यामुळे या चित्रपटातील कृती पूर्णपणे भावनेवर आधारित आहे.

» एका अभिनेत्रीचा विजय म्हणजे सर्वांचाच विजय : मोठ्या अर्थसंकल्पाच्या महिला-केंद्रित कृतीप्रधान चित्रपटांची मागणी बॉलिवूडमध्ये अनेक वर्षांपासून होत आहे. मात्र, आलिया भट्टच्या ‘अल्फा’ला अपेक्षित यश मिळाले नाही. महिला केंद्रित चित्रपटांच्या भवितव्यावर त्याचा परिणाम होतो का, असा प्रश्न विचारला असता तापसी म्हणाल्या, की या बाबतीत एका महिला-केंद्रित चित्रपटाचे यश म्हणजे आपल्या सर्वांचे यश असते. एखादा असा चित्रपट यशस्वी झाला की, ‘अशा प्रकारचा चित्रपटही चालू शकतो’, असा आत्मविश्वास इतर निर्माते आणि कलाकारांना मिळतो. त्याचप्रमाणे असा चित्रपट अपयशी ठरला, विशेषतः मोठ्या अर्थसंकल्पाचा चित्रपट अपयशी ठरला, तर त्याचे नुकसानही आपल्या सर्वांचे होते. त्यामुळे मनाला वाईट वाटते की, हा चित्रपट यशस्वी व्हायला हवा होता. लोक म्हणतात की चांगले चित्रपट चालतात. पण पुरुषप्रधान सर्वच कृतीप्रधान चित्रपट अप्रतिम असतात का? ते अत्यंत उत्कृष्ट होते म्हणूनच ते यशस्वी झाले, असे नाही. अनेक सरासरी दर्जाचे, मोठ्या प्रमाणावर बनवलेले पुरुष-केंद्रित चित्रपटही यशस्वी होतात. मात्र, दुर्दैवाने महिलांना तितकी मोकळीक मिळत नाही. तापसी पुढे म्हणाल्या, की “महिलांच्या कथा १९-२० असू शकत नाहीत; त्या २१ असाव्या लागतात, तरच त्या यशस्वी होतात. महिलांना प्रत्येक गोष्टीत स्वतःला सिद्ध करण्यासाठी थोडे अधिकच कष्ट घ्यावे लागतात.

» कनिका आणि मी एकमेकींना चांगल्या प्रकारे समजून घेतो... : लेखिका-निर्माती कनिका ढिल्लो यांच्यासोबत तापसी पन्नू यांनी ‘मनमर्जियां’, ‘हसीन दिलरुबा’, ‘रश्मी रॉकेट’ आणि ‘फिर आई हसीन दिलरुबा’ यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. ‘गांधारी’च्या निमित्ताने त्यांच्या या नात्याबद्दल तापसी म्हणाल्या, की कनिका यांनी ‘मनमर्जियां’ची कथा मला अत्यंत सविस्तरपणे सांगितली होती. अगदी दृश्यांदरम्यानची गाणीही त्यांनी मला ऐकवली होती. मात्र, ‘गांधारी’ची कथा त्यांनी केवळ चार ओळींत सांगितली आणि म्हणाल्या, ‘तू हे करणार असशील तर मी पुढे कथा लिहिते. आमच्यात आता एकमेकांना समजून घेण्याची आणि परस्परांवर विश्वास ठेवण्याची इतकी सवय झाली आहे की, कनिकाला मला कोणत्या भूमिका करायला आवडतील आणि कोणत्या आवडणार नाहीत, हे माहीत आहे. त्याचप्रमाणे तिने मला दोन ओळी जरी कथा सांगितली, तरी त्यानंतर ती ती कथा पूर्णपणे लिहून काढेल, याची मला खात्री असते. निर्माती म्हणूनही ती चित्रपट सर्वोत्तम पद्धतीने तयार करेल, याचा मला विश्वास आहे. त्यामुळे मला कोणतीही लढाई लढावी लागत नाही. माझ्यासाठी कनिकाच ती लढाई लढते. त्यामुळे मी खूप निर्धास्त असते, असे तापसी म्हणाल्या.

### आपण आपला मार्ग शोधला पाहिजे...


महिला कलाकारांना मिळणाऱ्या दुहेरी निकषांबाबत तापसी म्हणाल्या, की हे चुकीचे आहे. पण या परिस्थितीतून आपला मार्ग आपल्यालाच शोधावा लागेल. आपण पराभूत होऊन बसू शकत नाही. त्यामुळे आम्ही प्रयत्न करत आहोत. आज नाही तर भविष्यात कधीतरी परिस्थिती नक्की बदलेल, अशी आशा आहे. जोपर्यंत प्रश्न विचारले जातील, तोपर्यंत हा मुद्दाही सुरू राहील, असे तापसी म्हणाल्या. तापसी पन्नू आणि कंगना रणौत यांच्यातील जुना वाद पुन्हा चर्चेत आला होता. एका ध्वनिमुद्रित संवादात तापसी यांनी कंगनाच्या संगोपनावर प्रश्न उपस्थित केल्यानंतर कंगनानेही त्यांच्यावर टीका केली होती. या वादाबाबत तापसी म्हणाल्या, की माध्यमांना हा विषय संपवायचाच नाही. खरोखरच हा विषय संपवायचा असेल तर माध्यमे आम्हाला याबाबत प्रश्न विचारणे थांबवू शकतात. पण मथळ्यांसाठी ‘यांनी हे म्हटले’, ‘त्यांनी ते म्हटले’ असे सांगत हा विषय सतत चर्चेत ठेवला जातो. वर्षानुवर्षे हा प्रश्न पुन्हा पुन्हा विचारला जातो. हा आणखी किती वर्षे सुरू राहणार, हे मला समजत नाही. आम्हाला हा प्रश्न विचारला गेला नाही, तर आमच्यापैकी कोणालाही या विषयावर बोलण्याची किंवा त्याची चर्चा करण्याची गरज वाटेल, असे मला वाटत नाही. आम्हाला प्रश्नच यासाठी विचारले जातात की, आम्ही काहीतरी बोलावे आणि त्यातून सनसनाटी निर्माण करणारी एखादी गोष्ट काढून ती लोकांसमोर मांडता यावी. लोकांनी ते वाचावे आणि त्यांचे मनोरंजन व्हावे, एवढाच त्यामागचा उद्देश असतो.



# 10 वर्षांनंतर ‘टीव्ही’वर परतला क्रिकेटचा दादा!

**भारतीय क्रिकेटमधील दिग्गज आणि माजी कर्णधार सौरव गांगुली यांनी तब्बल दशकभरानंतर छोट्या पडद्यावर पुनरागमन केले आहे. लोकप्रिय रिॲलिटी शो ‘बिग बॉस बांगला’ च्या नव्या पर्वाचे सूत्रसंचालन करताना गांगुली दिसत आहेत. तब्बल १० वर्षांनंतर दूरचित्रवाणीवर परतलेल्या गांगुलींसाठी हा नवा अनुभव विशेष ठरला आहे.**

सौरव गांगुली यांनी आपल्या कारकिर्दीत यापूर्वी अनेक दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे सूत्रसंचालन आणि निवेदन केले आहे. मात्र, जवळपास १० वर्षांनंतर त्यांनी पुन्हा छोट्या पडद्यावर पाऊल ठेवले आहे. या नव्या भूमिकेबद्दल गांगुली म्हणाले, की ‘बिग बॉस’सारखी व्यापक पोहोच असलेला दुसरा कोणताही दूरचित्रवाणी कार्यक्रम आहे, असे मला वाटत नाही. मी अनेक वर्षांपासून हा कार्यक्रम पाहत आलो आहे. विविध भाषांमधील प्रेक्षकांशी या कार्यक्रमाने घट्ट नाते निर्माण केले आहे. भारताबाहेरही हा कार्यक्रम लोकप्रिय झाला आहे. गांगुली म्हणाले, “१० वर्षांनंतर ‘बिग बॉस बांगला’चे नवे पर्व सुरू झाले असून, या नव्या अध्यायाचे सूत्रसंचालन करताना मला अत्यंत उत्साह वाटत आहे. त्याचबरोबर ‘एंडेमोल शाइन इंडिया’सोबत काम करण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे. त्यामुळे हा प्रकल्प माझ्यासाठी खरोखरच विशेष आहे.” माजी क्रिकेटपटू गांगुली यांनी यापूर्वी विविध दूरचित्रवाणी कार्यक्रमांमध्ये सूत्रसंचालक आणि निवेदक म्हणून काम केले आहे. मात्र, ‘बिग बॉस बांगला’च्या माध्यमातून त्यांनी प्रथमच ‘बिग बॉस’च्या फ्रँचायझीत प्रवेश केला आहे. दरम्यान, ‘बिग बॉस’च्या हिंदी आवृत्तीचे ऐतिहासिक २०वे पर्वही सुरू झाले आहे. या पर्वाचे सूत्रसंचालन अभिनेता सलमान खान करत आहेत. ५ सप्टेंबरपासून ‘बिग बॉस बांगला’च्या नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे. या पर्वात एकूण १५ स्पर्धक



सहभागी झाले आहेत. घरात दाखल झालेल्या या स्पर्धकांसमोर विविध कार्ये आणि आव्हाने असणार असून, कार्यक्रमात अनपेक्षित वळणे आणि नाट्यमय घडामोडी पाहायला मिळणार आहेत. या पर्वातील स्पर्धकांमध्ये अभिनेत्री मोनामी घोष, सोहिनी पाल, सोनामोनी साहा, नंदिनी रॉय, श्रीजला गुहा आणि झिलम गुप्ता, अभिनेते भरत कौल, अनिंद्य सेनगुप्ता आणि निरंजन मंडल, गायक दुर्निबार साहा, उद्योजिका तनुश्री रॉय दास तसेच प्रभावशाली व्यक्तिमत्त्वे सायाक चक्रवर्ती आणि जयिता चॅटर्जी यांचा समावेश आहे.

# जेव्हा नात्यांवरील विश्वास तुटतो...

## » ‘बिग बॉस 20’मध्ये येताच अभिनेत्री भावुक; तुटलेल्या विवाहाचे दु:ख अश्रूंमधून व्यक्त

**लोकप्रिय रिॲलिटी शो ‘बिग बॉस २०’चा ग्रँड प्रीमियर ६ सप्टेंबर रोजी होणार आहे. यंदाच्या पर्वात १८ स्पर्धक सहभागी होणार असून, शो सुरू होण्यापूर्वीच अनेक स्पर्धकांचे प्रोमो समोर येत आहेत. त्यापैकी एका प्रोमोमध्ये एका अभिनेत्रीने आपल्या खासगी आयुष्याबद्दल बोलताना भावुक होत तुटलेल्या नात्याचे दुःख व्यक्त केले आहे.**

‘बिग बॉस २०’च्या नव्या प्रोमोमध्ये संबंधित अभिनेत्री आपल्या भूतकाळातील नात्याबद्दल बोलताना भावुक झाल्याचे दिसत आहे. प्रोमोमध्ये ती म्हणते, “मी पंजाबी आणि हिंदी चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. तो माझ्या आयुष्यातील सर्वात सुंदर काळ होता. त्यानंतर मला प्रेम झाले आणि त्यानंतर मला जे काही सहन करावे लागले... जेव्हा नात्यांवरील तुमचा विश्वास तुटतो, तेव्हा...” हे सांगताना अभिनेत्रीच्या डोळ्यांत अश्रू तरळल्याचे प्रोमोमध्ये दिसते. हा प्रोमो समोर आल्यानंतर सोशल मीडियावर ही अभिनेत्री ईशा रिखी असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. ईशा रिखी यांचे नाव गायक आणि रॅपर बादशाह यांच्यासोबत जोडले गेले होते. त्यांच्या नात्याबाबत यापूर्वीही चर्चा झाली होती. मात्र, प्रोमोमध्ये अभिनेत्रीचे नाव स्पष्टपणे जाहीर करण्यात आलेले नसल्याने तिची ओळख अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेली नाही.

पाच महिन्यांतच विवाह तुटल्याचा दावा... : प्रसारित वृत्तानुसार, बादशाह आणि ईशा रिखी यांनी याच वर्षी मार्चमध्ये गुपचूप विवाह केला होता. मात्र, अवघ्या पाच महिन्यांत त्यांचे नाते संपुष्टात आल्याचे सांगितले जात आहे. दोघांनीही विभक्त होण्यामागील नेमके कारण सार्वजनिक केलेले नाही. त्यामुळे आता ईशा रिखी ‘बिग बॉस २०’च्या घरात प्रवेश केल्यानंतर या नात्याबाबत आणि विभक्त होण्यामागील कारणाबाबत काही खुलासा करणार का, याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.

बादशाह यांचा हा दुसरा विवाह होता : ईशा रिखी या बादशाह यांच्या दुसऱ्या पत्नी असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी बादशाह यांनी २०१२ मध्ये जॅस्मिन मसीह यांच्याशी विवाह केला होता. मात्र, सुमारे आठ वर्षांनंतर त्यांचा हा विवाहही संपुष्टात आला. या विवाहातून त्यांना जॅसी ग्रेस नावाची मुलगी आहे. ‘बिग बॉस’च्या घरात स्पर्धकांच्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेकदा चर्चा रंगते. त्यामुळे या प्रोमोमुळे ईशा रिखी यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि तुटलेल्या नात्याबद्दल त्या शोमध्ये नेमका काय खुलासा करणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# गोविंदा रे गोपाळा.... ठाण्यात ७१ लाखांची हंडी, मुंबईतही २५ लाखांच्या हंड्या

**ठाणे (प्रतिनिधी)** – ५ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभरात दहीहंडी (ऊहळहरपवळ २०२६ ) उत्सव अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला जात आहे. यंदा विविध दहीहंडी मंडळांकडून गोविंदा पथकांसाठी लाखो रुपयांची बक्षिसे जाहीर करण्यात आली असून, अनेक ठिकाणी मराठी आणि हिंदी मनोरंजनसृष्टीतील कलाकारांची उपस्थिती हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. ठाण्यातील स्वामी प्रतिष्ठान दहीहंडी महोत्सव यंदा विशेष चर्चेत आहे. या महोत्सवात तब्बल ७१ लाख रुपयांची बक्षिसे वितरित केली जाणार आहेत. गोविंदा पथकांचा मोठा सहभाग आणि 'सेलिब्रिटी हंडी' म्हणून मिळालेली ओळख यामुळे या उत्सवाकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.ठाण्यातील टेंभी नाका दहीहंडी देखील मानाची मानली जाते. मुंबई आणि ठाण्यातील गोविंदा पथकांसाठी स्वतंत्र हंड्या ठेवण्यात आल्या असून, विजेत्या पथकांना प्रत्येकी १ लाख ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह दिले जाणार आहे. महिलांच्या गोविंदा पथकासाठीही १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

शिवसेना आमदार प्रकाश सुर्वे दहीहंडी – मागाठाणे येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा आमदार प्रकाश सुर्वे यांच्याकडून दहीहंडी उत्सव साजरा केला जाणार आहे. मातृभाषा मराठीचा जागर संकल्पना राबत हा दहीहंडी उत्सव साजरा केला जाणार आहे. यामध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीचा रंगारंग मनोरंजनाचे कार्यक्रम आणि सेलिब्रिटींची उपस्थिती पाहायला मिळेल. घाटकोपर पूर्व,



शिवसेना नगरसेवक किरण लांडगे यांची ११ लाख ११ हजार ३१६ (शिक्षक दिन निम्मित, शिक्षक सन्मान हंडी)–आयशा खान, द्विंदु शर्मा,अमृता खानविलकर, आफताब शिवदासनी, रॅपर सांबाता, सोनल चव्हाण, हुसेन मन्सुरी, रेहमान खान, पार्थ भालेराव, रितेश देशमुख उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

स्वामी प्रतिष्ठान दहीहंडी महोत्सव २०२६ यंदाची दहीहंडी तब्बल ७१ लाखांची!, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह कलाकारांची उपस्थिती.. ठाण्यात भाजप आमदार शिवाजी पाटील – गोविंदा पथकांसाठी ७१ लाखांची बक्षीस देण्यात येणार आहे... या कार्यक्रमात सुद्धा मनोरंजन कार्यक्रम सेलिब्रिटींची हजेरी पाहायला मिळेल.

घाटकोपर – मनसेचे गणेश चुक्कलांची अनोखी हंडी, जेन–झीच्या क्रांतीला सलामी देणारी हंडी..२०२५ च्या दहीहंडी उत्सवात ज्या ठिकाणी सर्वात प्रथम जय जवान गोविंदा पथक यांनी १० थर लावून विश्वविक्रम रचला तीच दहीहंडी म्हणजे श्री गणेश चुक्कल यांची अमृत नगरची दहीहंडी, ज्यामुळे संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं.तसेच शिक्षण क्षेत्रात सुरू असलेला भ्रष्टाचार आणि अनागोंदी कारभाराविरुद्ध संतप्त होऊन ऋएछ–न नी एकत्र येऊन जो लढा उभा केला, आंदोलन उभं केलं, त्यातून आजच्या युगातली तरुणांनी घडवून आणलेली क्रांती संपूर्ण देशाने पाहिली. त्यामुळे महासत्तेला देखील त्यांच्यासमोर झुकावं लागलं.त्यांच्या याच शौर्याला सलाम करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे घाटकोपर विभाग अध्यक्ष श्री गणेश चुक्कल यांनी यावर्षीची हंडी ऋएछ–न ला अर्पण केली आहे.गतवर्षी प्रमाणे याही वर्षी या दहीहंडीला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला आहे. आत्तापर्यंत ९८० हून अधिक मंडळांनी रजिस्ट्रेशन केले आहे.तसेच भारतीय उत्कृष्ट क्रिकेटपटू सूर्यकुमार यादव, सिने अभिनेते रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख, हास्यजत्रेमधील प्रियदर्शनी इंदलकर, रोहित माने, प्रतीक्षा कोते, सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे, क्रे टेक्स तसेच परदेशी नागरिक देखील कार्यक्रमाला विशेष हजेरी लावणार आहेत.त्यामुळेच अमृत नगरचे सर्कल याही वर्षी गर्दीने हाऊसफुल होणार आहे.

# बिहारमध्ये पूर, ६.६५ लाख लोकांना फटका; केदारनाथ यात्रा स्थगित

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – राजस्थान, मध्यप्रदेश आणि यूपीमध्ये सतत पाऊस पडत आहे. मध्य प्रदेशातील १९ जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा इशारा आहे. शिवपुरी–मुरैनासह ७ जिल्ह्यांमधील शाळा बंद आहेत.

राजस्थानमधील धौलपूर, करौली, सवाई माधोपूरमध्ये शनिवारी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. जयपूरमध्ये रात्रभर झालेल्या पावसामुळे तापमानात ७ अंशांपर्यंत घट झाली आहे. झालावाडमधील शाळा बंद करण्यात आल्या आहेत. उत्तर प्रदेशात मान्सून पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील पाच दिवस राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.



गंगा–यमुनासह १० हून अधिक नद्यांना पूर आल्याने राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. सुमारे ३.५३ लाख लोक बाधित झाले आहेत, तर १७,५४४ लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.

तर, बिहारमध्येही १६ जिल्ह्यांमध्ये पुरामुळे सुमारे ५ लाख लोक बाधित झाले आहेत. गंगा नदीसह ८ प्रमुख नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. आपत्कालीन विभागाच्या मते, पाटणामध्ये गंगेची पाणी पातळी आतापर्यंतच्या सर्वोच्च पूर पातळीला ओलांडू शकते. उत्तराखंडमधील केदारनाथमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे, त्यामुळे यात्रेकरूंना सुरक्षित ठिकाणी थांबवण्यात आले आहे.

# पेपरफुटीच्या घटनांनंतर राज्य सरकारचा मोठा निर्णय: नोकरभरतीत सुधारणासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन, ७ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची औषध निरीक्षक पदाची परीक्षा आणि त्यापूर्वीची 'टीईटी' परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द करावी लागल्याने राज्यातील तरुणांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेत, राज्यातील स्पर्धा परीक्षा आणि नोकरभरती प्रक्रियेत पारदर्शकता आणून आवश्यक सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली असून, यामध्ये विविध वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील नोकरभरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि सध्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यात आली असून, यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे.



या सात सदस्यीय समितीमध्ये राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, यूपीएससीचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले आणि आयआयटी मुंबईचे प्रा. श्यामप्रसाद करगड्डे या तज्ज्ञ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

विविध विभागांकडून राबवल्या जाणाऱ्या विद्यमान परीक्षा पद्धतींचे पुनर्विलोकन करून त्यात आवश्यक बदल सुचवण्याचे मुख्य काम ही समिती करेल. भरती प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासाठी प्रश्नपत्रिका निर्मिती, गोपनीयता, डिजिटल वितरण आणि परीक्षा केंद्रांच्या सुरक्षेवर विशेष भर दिला जाईल. तसेच पेपरफुटी, तोतया उमेदवार, संगनमत आणि इलेक्ट्रॉनिक गैरप्रकार कायमचे रोखण्यासाठी समिती प्रभावी उपाययोजना सुचवणार आहे.

# देशातील ४८ शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – शिक्षक दिनानिमित्त, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी दिल्लीतील विज्ञान भवन येथे देशभरातील ४८ शालेय शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले. यामध्ये केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय, सैनिक शाळा, आदर्श आदिवासी शाळा आणि पीएम श्री शाळांमधील शिक्षकांचा समावेश आहे.

या शिक्षकांनी अभ्यास सोपा आणि मनोरंजक बनवण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला. महाराष्ट्रातील वैभव वसंतराव कुलकर्णी यांनी गणिताचे कठीण विषय समजावण्यासाठी ७०० हून अधिक व्हिडिओ तयार केले. तर राजस्थानच्या दिव्येंदु सेन यांनी ५०० झाडांवर क्यूआर कोड लावून



मुलांना झाडांची माहिती देण्याचा एक नवीन मार्ग अवलंबला.

याव्यतिरिक्त, पंजाबच्या दिनेश कुमार यांनी व्हर्च्युअल फिजिक्स लॅब आणि १०० हून अधिक कमी खर्चाचे मॉडेल्स तयार केले. ४८ शालेय शिक्षकांव्यतिरिक्त, उच्च शिक्षण संस्था आणि पॉलिटेक्निकमधील २१ शिक्षक व प्राध्यापक सदस्य आणि कौशल्य विकास मंत्रालयाच्या १३ कौशल्य प्रशिक्षकांनाही राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. पंजाबचे शिक्षक दिनेश कुमार यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी व्हर्च्युअल फिजिक्स लॅब आणि १०० हून अधिक शून्य–खर्च मॉडेल्स तयार करून विद्यार्थ्यांसाठी भौतिकशास्त्र सोपे आणि मनोरंजक बनवले. पंजाबचे शिक्षक दिनेश कुमार यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी व्हर्च्युअल फिजिक्स लॅब आणि १०० हून अधिक शून्य–खर्च मॉडेल्स तयार करून विद्यार्थ्यांसाठी भौतिकशास्त्र सोपे आणि मनोरंजक बनवले.

# ट्रम्प यांची इराणच्या अणु प्रकल्पावर हल्ल्याची धमकी

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)** – अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प



यांनी इराणच्या अत्यंत सुरक्षित भूमिगत अणु ठिकाणावर, पिक्क्स माउंटनवर, लवकरच जोरदार हल्ला करण्याची धमकी दिली आहे.

ट्रम्प यांनी शुक्रवारी ओव्हल ऑफिसमध्ये पत्रकारांना सांगितले की, या ठिकाणी कोणत्याही प्रकारची हालचाल दिसली तर अमेरिका त्याला लक्ष्य करू शकते. ते म्हणाले की, अमेरिकेच्या गुप्तचर संस्था या ठिकाणावरील घडामोडींवर बारकी लक्ष ठेवून आहेत.

ट्रम्प यांनी इराणविरुद्ध गेल्या पाच महिन्यांपासून सुरू असलेल्या अमेरिकेच्या लष्करी मोहिमेचे समर्थन केले. ते म्हणाले की, या मोहिमेचा सर्वात मोठा उद्देश इराणला अणुबॉम्ब बनवण्यापासून रोखणे हा आहे.

पिक्क्स माउंटन इराणमधील नतांझ युरेनियम संवर्धन केंद्राजवळ आहे. नतांझला यापूर्वीच मोठे नुकसान झाले आहे. पिक्क्स हे जमिनीखाली बांधलेले अत्यंत मजबूत आणि सुरक्षित संकुल आहे. यात जमिनीखाली खूप खोलवर दोन मोठ्या बोगद्यांची प्रणाली असल्याचे सांगितले जाते. द वॉल स्ट्रीट जर्नलच्या एका रिपोर्टनुसार, इस्रायली गुप्तचर अधिकाऱ्यांचे मत आहे की, इराणने हजारो सेंट्रीफ्यूज या खोल भूमिगत ठिकाणी हलवले आहेत. सेंट्रीफ्यूजचा वापर युरेनियमचे संवर्धन करण्यासाठी केला जातो.

पिक्क्स माउंटन जमिनीखाली खूप खोलवर असल्यामुळे सामान्य हवाई हल्ल्यांनी त्याला नुकसान पोहोचवणे कठीण आहे. त्यामुळे अमेरिकेने या ठिकाणावर हल्ला केला, तर ते इराणच्या अणु ठिकाणांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेला आणखी मोठे स्वरूप देऊ शकते. ट्रम्प यांनी असाही दावा केला की, अमेरिकेच्या लष्करी कारवाईमुळे पश्चिम आशियामध्ये मोठे युद्ध होण्यापासून वाचले आहे.

त्यांनी सांगितले की, अमेरिकेने कारवाई केली नसती, तर इस्रायल आणि संपूर्ण पश्चिम आशियाला अधिक गंभीर धोक्याचा सामना करावा लागला असता. ट्रम्प म्हणाले, ट्रम्प यांनी इराणच्या रडार प्रणालीवर अमेरिकेने केलेल्या अलीकडील हल्ल्यांबद्दलही सांगितले. त्यांनी दावा केला की, अमेरिकन सैन्याने इराणची अत्यंत आधुनिक रडार प्रणाली दोनदा नष्ट केली आहे. ट्रम्प म्हणाले की, अलीकडील हल्ल्यापूर्वी अनेक दिवस कोणतीही गोळीबार झाला नव्हता. पण इराणने आधी रडार लावले होते, जे अमेरिकेने नष्ट केले.

# भारत–पाकिस्तान सामन्यात हरमनप्रीत कौरचा ऐतिहासिक विक्रम; १५० टी–२० सामन्यांत कर्णधारपद भूषवणारी पहिली क्रिकेटपटू

**दुबई (वृत्तसंस्था)** – महिला आशिया कप २०२६ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याला सुरुवात झाली असून, या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने ऐतिहासिक विक्रमाची नोंद केली आहे. हरमनप्रीत ही पुरुष आणि महिला क्रिकेट मिळून १५० ढ२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत कर्णधारपद भूषवणारी पहिली क्रिकेटपटू ठरली आहे.



हरमनप्रीतने आतापर्यंत तब्बल १५० सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व केले आहे. त्याचबरोबर या यादीत श्रीलंकेची चमारी अटापट्टू १२१ सामन्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलियाची मेग लॅनिंग १०० सामन्यांसह तिसऱ्या, तर इंग्लंडची हीदर नाइट आणि रवांडाची डायन बिमनिमाना प्रत्येकी ९६ सामन्यांसह चौथ्या क्रमांकावर आहेत.

दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या नाणेफेकीत पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी आपल्या प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

हरमनप्रीत कौर २०१२ पासून भारतीय संघाचे नेतृत्व करत आहे. पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात नेतृत्व करत तिने १५० टी–२० सामन्यांत कर्णधारपद भूषवण्याचा टप्पा गाठला. यापूर्वी पुरुष किंवा महिला क्रिकेटमध्ये कोणत्याही खेळाडूने हा आकडा गाठलेला नव्हता. या सामन्यापूर्वी भारताने आशिया कपमधील पहिले दोन्ही सामने जिंकले होते. थायलंडवर भारताने ९४ धावांनी, तर हाँगकाँगविरुद्ध १३७ धावांनी विजय मिळवला. त्यामुळे भारताने उपांत्य फेरीतील आपले स्थान आधीच निश्चित केले आहे. पाकिस्तानविरुद्धचा सामना जिंकून साखळी फेरी अपराजितपणे पूर्ण करण्याचे भारताचे लक्ष्य आहे.


## दि. नांदेड को-ऑप हाऊसिंग सोसायटी लि.

विजय नगर, नांदेड.

रजि. नं. ११५, (फक्त सभासदाकरीता) स्थापना दिनांक ११-८-१९६५

### नोटीस

दिनांक : ०६/०९/२०२६

स. न. वि. वि.,

दि. नांदेड को–ऑप हाऊसिंग सोसायटी लि. विजयनगर, नांदेड ची सन २०२५–२०२६ ची ६१ वी वार्षीक सर्वसाधारण सभा दि. २०/०९/२०२६ रोजी संस्थेचे **अध्यक्ष मा. बाबुराव मारोतराव कदम** यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११.३० वाजता, **हनुमान मंदिर (सभागृह) विजय नगर, नांदेड** येथे खालील विषय सुचिवर चर्चा करण्यासाठी बोलावण्यात आली आहे.

**विषय सुची :–**

१. दि. १४.०९.२०२५ रोजी झालेल्या संस्थेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे.
२. सन २०२५–२०२६ सालाचा कार्यकारी मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा–तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक यांचे वाचन व त्यास मान्यता देणे.
३. सन २०२५–२०२६ सालातील अंदाज पत्रका पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे, तसेच सन २०२६–२०२७ सालाच्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
४. सन २०२५–२०२६ सालाचे लेखापरिक्षण अहवालास व दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
५. सन २०२५–२०२६ सालातील प्लॉट हस्तांतरीत सभासदांचे सभासदत्व रद्द करुन नविन सभासदत्व बहाल केले त्यास मान्यता देणे.
६. सन २०२६–२०२७ सालासाठी लेखा परीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यासाठी मान्यता देणे.
७. संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व इतर क्षेत्रातील यशस्वीतांचा सत्कार करणे बाबत.
८. मा. अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा व निर्णय घेणे.

■ नोट :........................

१. गणसंख्या पूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने त्याच विषय सुचीवर सुरु होईल. अशा सभेस गणसंख्या पुर्ततेची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षीक सर्व साधारण सभेस सभासदांना कांही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी सभेच्या अगोदर ते लेखी ७ दिवसांच्या आत कार्यालयात मिळतील अशारितीने पाठवावीत.
३. संस्थेचे हिशोब पत्रके कार्यालयीन वेळात पहावयास मिळतील.
४. संस्था सभासदांचे गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात येईल तरी ज्यांचे पाल्य १० वी, १२ वी परिक्षेत ८०% च्या वर गुण असणारे व NEET-JEE इतर स्पर्धापरिक्षेत यश प्राप्त केलेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात येईल.

कार्यकारी मंडळाचे आदेशावरुन
गणेश बाजीराव मस्के
सचिव



## Change In Name

My Old Name is **ABDUL AQEEL** which now I am changing as New Name **ABDUL AQEEL ABDUL AHAD.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -**
**Mohseen Colony Near Masjid -A-Faran**
**Degloor Naka Nanded 431604**
**Mob. No. -7757868066**



## टी.सी. हरवली

माझी वालानडीकर मोहम्मद अनस वालानडीकर लतीफ या नावाची बारहवीं पास सना जूनियर कॉलेजची टी.सी. लेबर कॉलोनी ते रेल्वे स्टेशन प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता – वालानडीकर लतीफ**
**लेबर कॉलोनी, नांदेड**
M0. No. ९४२१०८९२३४



## Change In Name

My Old Name is **SAYED TALHA ALI URF ABED** which now I am changing as New Name **SYED TALHA ALI ABED.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -**
**Hyderbagh No. 1, Near Hyder Function Hall, Degloor Naka Nanded**
**Mo.No. 9022437108**



## Change In Name

MY OLD NAME IS **SAYYED RASUL** WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME **RASUL RAHEMAN SAYYAD** HENCEFORTHMYALLCORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE CONSIDER THE SAME.

ADDRESS: 3-3-103, BAGAMAR GALLI,
NEAR POLICE STATION THANE, MUDKHED,
TQ, MUDKHED, DIST. NANDED - 431806



## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार नामे-विलास पि. उद्धव तुप्तेवार, रा. कामारी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की,

हे की, माझे पक्षकार यांनी साहेबराव पि. बापूराव पाटील, रा.गोळेगांव, ता.नायगांव, जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील त्यांनी नोंदणीकृत दस्त क्र. 806/2025 दिनांक 23-02-2025 अन्वये खरेदी केलेला नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील सिडको, नविन मोंढा, नांदेड प्रकल्पातील सर्वे नं.51 (वसरणी मोंढा मार्केट ) मधील एक भूखंड क्र. 218, सेक्टर WHM , क्षेत्रफळ 167.25 चौरस मिटर असून ज्याची चतुःसीमा पूढीलप्रमाणे आहे-

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्वेस | : भूखंड क्र. 217 आहे | पश्चिमेस | : भूखंड क्र. 219 आहे |
| उत्तरेस | : भूखंड क्र.230 आहे | दक्षिणेस | : 09 मिटर रूंद रोड आहे, |

येणेप्रमाणे चतुःसीमेच्या आतील प्लॉट / भूखंड क्र.218 आहे त्या स्थितीत जलतरू पाषाणासह, आंतरीक व बाह्य हक्कांसह माझ्या पक्षकाराने विकत घेण्याचा तोंडी सौदा, करार केला आहे व करारापोटी सदरील प्लॉट विक्री करणार यांना बयाना रक्कम पण दिली आहे व काही दिवसांच्या आत उर्वरित रक्कम देऊन सदर प्लॉटचे नोंदणीकृत खरेदीखत श्रीनिवास पि. श्रीकिशनजी काबरा यांचेकडून करुन घेण्याचे ठरले आहे.

तरी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर माझे पक्षकाराचे व्यवहारा बाबत व सदर वर नमूद प्लॉट/ भूखंड क्र.218 बाबत कोणाचा काही, आक्षेप, उजर, हितसंबंध असल्यास त्यांनी तसा लेखी आक्षेप, उजर, हरकत सबळ कागदोपत्री पूराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारेखपासून 07 (सात) दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्यावर नोंदवावा, अन्यथा विहीत मुदतीनंतर माझे पक्षकार सदर प्लॉट/ भूखंड क्र.218 चे नोंदणीकृत खरेदीखत करून घेतील व मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक :-04-09-2026
मार्फत


ॲड.बी.एम.शिरफुले
यशवंत नगर, नांदेड
मो.नं.9922532729

जाहीर प्रगटन देणार
विलास पि. उद्धव तुप्तेवार
रा. कामारी, ता. हिमायतनगर,
जि. नांदेड



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## Change In Name

MY OLD NAME IS ABDUL RAHMAN TO WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME ABDUL RAHEMAN HENCE FORTH, MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE CONSID-ER THE SAME

SIGN: ABDUL RAHEMAN
ADDRESS NO.9-4-1107, MADINA NAGAR
DEGLOOR NAKA NANDED 431604,
MOB. NO.9518996264





**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# पोलिसांची अवैध वाळू उपशावर कारवाई; दोन हायवांसह २.१६ कोटींचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी पिंपळगाव व भनगी शिवारातील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर मोठी कारवाई करत २ कोटी १६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ४ सप्टेंबर रोजी गुन्हे शोध पथक रात्रगस्त व पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पिंपळगाव ते वाडीपाटी रस्त्यावर सापळा रचण्यात आला. यावेळी अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा – टाटा हायवा (MH-26-CH-7086) व भारत बेंझ हायवा (MH-26-CH-2409) प्रत्येकी ५ ब्रास रेतीसह, एकूण ९० लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

चालकांकडे चौकशी केल्यानंतर पथकाने तत्काळ पिंपळगाव व भनगी येथील गोदावरी नदीपात्रातील रेती घाटांवर छापा टाकला. पोलिसांना पाहताच वाळू उपसा करणारे इसम नदीच्या पाण्यात उड्या मारून पसार झाले. घटनास्थळावरून ७ फायबर बोटी–४ मोठ्या (८० लाख रु.) व ३ लहान (२१ लाख रु.), वाळू उपसा इंजिन – ३ (९ लाख रु.), ३५ तराफे (१७.५० लाख रु.) व त्यावरील ७० ब्रास रेती (३.५० लाख रु.) असा एकूण २ कोटी १६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल आढळला. बोटी, इंजिन, तराफे जागीच जाळून/तोडून व रेती नदीत उलटवून नष्ट करण्यात आले.

आरोपी ज्ञानेश्वर खंडू कोपनर (वय २१, रा. पांघरी, ता. लोहा, चालक), पिराजी रामदास आव्हाड (वय २२, रा. पेनूर, ता. लोहा, चालक), नारायण नरहरी पुंड ( वाळू घाट मालक), अर्जुन जगन्नाथ येवले (वाळू घाट मालक) व इतर ९ अनोळखी फरार इसमांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.नं. ११२८/२०२६, कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहितासह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि व्यंकट कुसमे व अंमलदार जीवन तेलंग, भगवान टिपसरे, भिसे, गफार शेख, कल्याणकर, पवार यांनी पार पाडली.

# नांदेडमध्ये खुनाचा प्रयत्न व दोन खंडणी प्रकरणी दहा जणांवर गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरात गेल्या दोन दिवसांत खुनाचा प्रयत्न आणि खंडणीच्या दोन वेगवेगळ्या घटना घडल्या असून, पोलिसांनी १० आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

**खुनाचा प्रयत्न**

दि. ४ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता सिंचन नगर, नांदेड येथे जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपी मयूर उर्फ मोनू लोणे व एक विधिसंघर्षित बालक (दोघे रा. झेंडा चौक) यांनी फिर्यादी महानंदा बालाजी ससाणे यांचा मुलगा प्रतीक ससाणे (वय २०) याच्यावर खंजरने पाठीवर वार करून गंभीर जखमी केले. आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे.

फिर्यादीच्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाणे गु.र.नं. ४९५/२०२६, कलम १०९(१), ३५२, ३(५) BNS व ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी ताब्यात आहेत. तपास पोनि. संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि कसबेवाड करीत आहेत.

**भाग्यनगर ठाण्यात खंडणीचा गुन्हा**

दि. ३ सप्टेंबर रोजी पहाटे ३.४० वाजता वेदांतनगर, मालेगाव रोड येथे आरोपी दिलीपसिंग हरीसिंग पवार, सुनील वाघमारे, लक्ष्मण पवार, अनिकेत सूर्यवंशी व बालाजी भारती यांनी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी बेबीताई परमेश्वर शिंदे (वय ३८) यांच्या घरी जाऊन खंजरचा धाक दाखवला. परळीच्या गुन्ह्यात खोटी साक्ष दे, नाहीतर तुझा मुलगा विश्वास याला जीवे मारू अशी धमकी देत ५ लाख रुपयांची खंडणी मागितली. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाणे गु.र.नं. ४९४/२०२६, कलम ३०८(४), २३२, ३५१(२)(३), १८९(२), १९०, १९१(२)(३) BNS व ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि देशमुख करीत आहेत.

**खंडणी व सावकारी**

दि. ४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता एस.के. मनी लॉन्ड्री जवळ, आरोपी बसंत कौर गल्लीवाले, रणदीपसिंग सरदार उर्फ दिपू, संजना गायकवाड व राज (सर्व रा. नांदेड) यांनी फिर्यादी कृष्णा गजानन चौधरी (वय २३, रा. जुना गंज) याला ३८ हजार रुपयांचे ६० हजार रुपये एका आठवड्यात परत करण्याच्या अटीवर दिले. फिर्यादीने ५९ हजार रुपये परत करूनही आरोपींनी त्याच्या फॉर्मवर सही–अंगठा घेऊन पुन्हा ६० हजार रुपयांची खंडणी मागितली व त्याच्या आई–आजीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. वजिराबाद पोलीस ठाणे गु.र.नं. ४५०/२०२६, कलम ३०८(२), १२७(२), २९६, ३५१(२)(३), ३(५) इछड सह कलम ४५ महाराष्ट्र सावकारी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दर्शने करीत आहेत.



**नांदेड–** गोरबंजारा तीज महोत्सव कार्यक्रमात बंजारा समाजाच्या महिलांनी पारंपरिक वेशभूषा प्रदान करून नृत्य केले. यावेळी त्यांच्यासोबत आ. श्रीजया अशोकराव चव्हाण, पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक, महापौर कविता मुळे, शीतल राठोड, डॉ. ज्योत्सना राठोड, गोदावरी समुहाच्या अध्यक्षा राजश्री पाटील, शिवालय उद्योग समुहाच्या अध्यक्षा संध्या कल्याणकर, बेबीताई नाईक, संयोजिका डॉ. निकिता चव्हाण, डॉ. आशा चव्हाण, सीमा राठोड आदी दिसत आहेत. **(छाया : करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा)**

# पूर्व शिक्षण संचालक गोविंद नांदेडे यांचा कलंबर येथे आज गौरव व ग्रंथतुला सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेड यांच्या पदव्यांची लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होऊन त्यांचा गौरव झाल्याबद्दल कलंबर खुर्द ता. लोहा येथे विद्यार्थी व ग्रामस्थांच्या वतीने गौरव सोहळा व ग्रंथतुला कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे.

डॉ. गोविंद नांदेडे हे जवळपास सव्वा दशक कलंबर खुर्द येथे प्राथमिक शिक्षक होते. त्या काळात त्यांनी शेकडो विद्यार्थी घडवले. त्यातील अनेकजण उच्च पदावर कार्यरत आहेत. प्रचंड व्यासंग, जिद्दीच्या बळावर प्राथमिक शिक्षक ते शिक्षण संचालक हा त्यांचा आश्चर्यकारक प्रवास राहिला आहे. १९ विश्व विद्यापीठातून ३८ पदव्या मिळवत ३०४ विद्यापीठीय परीक्षेत भूतपूर्व यश मिळवल्याची दखल घेत 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने त्यांचा सन्मान केला आहे. याच पार्श्वभूमीवर रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी कलंबर येथे डॉ. गोविंद नांदेडे यांचा गौरव व ग्रंथतुला सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक वतने, जिल्हा पोलीस प्रमुख निलाभ रोहन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माधव सलगर तसेच शिक्षण विभागातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कलंबर येथील विद्यार्थी व ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.

# शिक्षकदिनी राजेश मठमवार यांनी घेतले दोन विद्यार्थ्यांना दत्तक



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – माधवराव वटेमोड विद्यालय जुना कौठा नांदेड या शाळेचे सहशिक्षक तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे (प्रा.) जिल्हाध्यक्ष राजेश मठमवार यांनी दोन विद्यार्थ्यांना दत्तक घेत शिक्षक दिन साजरा केला.

५ सप्टेंबर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीनिमित्त शाळेतील कु. सायली राजेश भडके व शिवम ज्ञानेश्वर खानसोळे या विद्यार्थ्यांना दत्तक घेतले. दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेतील अनाथ, गोरगरीब, होतकरू मुला–मुलींना दत्तक घेऊन त्यांना वह्या, पेना, पॅड, शालेय दप्तर, शालेय गणवेश व परीक्षा शुल्क आदी शैक्षणिक साहित्य देण्यात आले. राजेश मठमवार हे गेल्या १२ वर्षापासून हा उपक्रम राबवीत आहेत. शैक्षणिक साहित्य दिल्यामुळे दत्तक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर चैतन्य व पालकांमध्ये समाधान दिसून आले. या राबविलेल्या स्तुत्य उपक्रमाबद्दल उपक्रमशील शिक्षक राजेश मठमवार यांचे कौतुक होत आहे.

# चंद्रकांत कवटीकवार यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको परिसरातील ज्येष्ठ



नागरिक चंद्रकांत कवटिकवार दहीकळंबेकर यांचे हृदयविकारामुळे शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी निधन झाले

मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिव देहावर सायंकाळी ७ वाजता सिडको नांदेड येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, चार मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# किनवट आगारातील जिजाऊ बसेसचे आ. केराम यांच्या हस्ते लोकार्पण



**किनवट (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या किनवट आगाराच्या ताफ्यात नव्याने दाखल झालेल्या राजमाता जिजाऊ या अत्याधुनिक बसेसचे आ. भीमराव केराम यांच्या हस्ते शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किनवटचे आगारप्रमुख अशोक चव्हाण होते. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, बाबुराव केंद्रे, नगरसेवक स्वागत आयनेनीवार, प्रशांत कोरडे, संतोष मरस्कोल्हे, बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय कन्नलवार, किनवट आगारातील शिलरत्न ढगे, बालाजी केंद्रे, गजेंद्र दासरवार, वरिष्ठ लिपिका सुवर्णा खोकले, राजकिरण नेम्मानीवार, चव्हाण, वसंत पिटलेवाड, गजानन चंद्रे, विश्वास कोल्हारीकर आदी मान्यवर उपस्थित होते. आगारप्रमुख अशोक चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. किनवटसारख्या आदिवासी व दुर्गम भागातील जनतेसाठी एस.टी. हीच जीवनवाहिनी आहे. नवीन बसेस आल्यामुळे प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल. किनवट आगाराच्या विकासासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन, अशी ग्वाही आ. भीमराव केराम यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरी कोंकेवाड यांनी केले.



**नांदेड–** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्या वतीने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन मिळालीच पाहिजे यासाठी महाराष्ट्र जुनी पेन्शन समन्वय संघ नांदेडच्या वतीने जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मूकमोर्चा काढून निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सूर्यकांत विश्वासराव, मधुकरराव उन्हाळे, संजय शिप्परकर, प्रा. डी. बी. जांभरूनकर, आनंद कानगुलवार, ज्ञानेश्वर टेंभरे, जी. एस. लदाफ, मधुकर पवार, सय्यद खादरसाब आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

पान १ वरून...

**रेल्वेमंत्र्यांनी केली पुणे...**

असल्याचेही यापूर्वी वैष्णव म्हणाले. पुणेकरांचे लक्ष या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे लागले आहे. बुलेट ट्रेनचे स्थानक कुठे असेल, मार्ग कोणता असेल, भाडे किती असेल, सेवा नेमकी कधी सुरू होईल, याची सविस्तर माहिती अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे ४८ मिनिटांचा प्रवास प्रत्यक्षात कधी शक्य होणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

**गैरप्रकार रोखण्यासाठी नोकर...**

उमेदवारांकडून अत्याधुनिक उपकरणांचा वापर करून कॉपी केल्याचे प्रकरण समोर आले होते. मोबाईल, टॅब, वॉकीटॉकी, इअरफोन आणि गुप्त कप्प्याचा वापर केल्याचे तपासात आढळले होते. त्यानंतर परीक्षांमधील गैरप्रकारांचा प्रश्न ऐरणीवर आला. या पार्श्वभूमीवर सरकारने २०२४ मध्ये 'महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (गैरप्रकार प्रतिबंध) अधिनियम' केला. प्रश्नपत्रिका फुटणे, गैरप्रकारासाठी संगनमत, अनधिकृत साधनांचा वापर आदींना आळा घालण्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली. मात्र कायदा असूनही २०२६ मध्ये टीईटी आणि एमपीएससीच्या घटनांनी कायदा करण्याबरोबरच परीक्षा घेण्याची प्रत्यक्ष कार्यपद्धती किती सुरक्षित आहे, हे तपासणे गरजेचे ठरले आहे. यामुळे या समितीची कार्यकक्षा व्यापक ठेवण्यात आली आहे.

**पुण्यात दहीहंडी उत्सवात...**

त्याच्या दुप्पट साऊंड लावणाऱ्या बिबवेवाडी येथील मंडळावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सोबतच साऊंड सिस्टिम देखील जप्त करण्यात आले आहेत. राहुल प्रकाश जगताप असे श्रीकृष्ण तरुण मंडळाच्या अध्यक्षाचे नाव आहे. या वर्षीच्या दहीहंडी मंडळावर गुन्हा दाखल झालेले हे पहिलेच मंडळ असल्याची माहिती आहे. दरम्यान, पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी ध्वनी प्रदूषणाबाबत सर्वांना इशारा दिला होता की, लाऊंड स्पीकरसाठी ४ बेस व ४ टॉप यांना परवानगी देण्यात येणार आहे.

# महात्मा फुले हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)**– बाबानगर येथील महात्मा फुले हायस्कूलमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका के. डी. सूर्यवंशी, प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका एस. आर. कदम उपस्थित होत्या. यावेळी शिक्षिका श्रीमती शिंदे तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. राम वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मराठी व इंग्रजी भाषेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. तसेच आपल्या शिक्षकांच्या कार्याचे आणि व्यक्तिमत्त्वातील विविध गुणांचे कौतुक करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अर्चना बारसे, श्रुती क्षीरसागर आणि ईश्वरी राजेगोरे यांनी केले. साक्षी नेव्हेल हिने आभार प्रदर्शन केले. या विद्यार्थिनींना साईनाथ कांडले यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम आनंददायी ठरला.

# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ऑटो संघटनांची बैठक

## कल्याणकारी मंडळासह विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा



**मुंबई/ नांदेड (प्रतिनिधी)**– परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई येथे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ऑटोरिक्षा चालक- मालक संघटना संयुक्त कृती समितीची राज्यस्तरीय बैठक पार पडली. वांद्रे येथील प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात झालेल्या या बैठकीत समितीचे अध्यक्ष शशांक राव आणि सरचिटणीस विलास भालेकर, मराठवाडा कार्याध्यक्ष अहेमद (बाबा) यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत कल्याणकारी मंडळ, ई-रिक्षा, ई-ऑटो, टू-व्हीलर बाईक प्रवासी वाहतूक, स्क्रॅप व बेकायदा ऑटोरिक्षा आणि पार्किंग स्टँडच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. ऑटो चालकांना वयाच्या ६५ वर्षानंतर दरमहा पेन्शन, कर्तव्यावर अपघाती मृत्यू झाल्यास कुटुंबाला १० लाखांची मदत, कुटुंबासाठी ५ लाखांपर्यंत वैद्यकीय सुविधा आणि मुलांच्या उच्च शिक्षणासाठी ५ ते १० लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज द्यावे, अशी मागणी करण्यात आली. यावर मंत्री सरनाईक म्हणाले, मागण्या विचाराधीन असून काही शासकीय योजनांची भर घालून मंडळाला भव्य स्वरूप देण्याचा प्रयत्न करू. यावर मंत्री म्हणाले, बाईक टॅक्सीला माझाही विरोध आहे, यावर आळा घालू. नियमबद्ध पद्धतीने परवाने देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करू.

मुख्य रस्त्यावर व गर्दीच्या ठिकाणी ई-रिक्षांना परवानगी नाही. ग्रामीण व शहरी भागात बिनानंबरच्या अवैध वाहनांबाबत मंत्री म्हणाले, अशी वाहने डिटेन करण्यासाठी पुरेशी जागा नाही, त्यामुळे स्पेशल स्कॉड तयार करून तिथेच जेसीबीने स्क्रॅप करण्याची कारवाई करू. २ ऑक्टोबर (गांधी जयंती) ते २२ जानेवारी (बाळासाहेब ठाकरे जयंती) पर्यंत ऑटो चालकांसाठी मराठी शिकवणी वर्ग राबवले जातील, असे मंत्री महोदयांनी सांगितले.

बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अप्पर आयुक्त रवींद्र गायकवाड, निकम, कल्याणकारी महामंडळाच्या संचालिका हिमांगी पाटील तसेच कृती समितीचे गंगाधर सरोदे, महिपती पवार, राजू पुजारी, शाकीर खान, किशोर सूर्यवंशी, मारोती कोडे, बी. के. पवार, किशोर खडताळे, नरेंद्र वाघमारे, विल्सन काडपूड, भैय्यासाहेब पवार, जब्बार भाई, इम्रान पठाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com